काबरा एक्सप्रेस
डेली A/C बस / अर्जंट पार्सल सर्विस • फुल लोड / पार्ट लोड सर्विस उपलब्ध
गुजरात अहमदाबाद, सुरत, अंकलेश्वर, राजकोट, बडौदा, किम, आनंद,नवसारी, वलसाड, वापी, भरुच, जामनगर
मध्यप्रदेश इंदौर, (राज महोल्ला, तीन इमली) उज्जैन
महाराष्ट्र मुंबई, (वसई, बोरीवली, अंधेरी, भिवंडी, वाशी) औरंगाबाद, नाशिक, पुणे
राजस्थान उदयपुर, अजमेर, जयपुर दिल्ली मोरी गेट
साऊथ बंगलोर, हैदराबाद, गोवा
अहमदनगर नेवासकर पेट्रोल पंपासमोर, मार्केटयार्ड चौक, स्टेशन रोड 7972872112
EYE Q MEDIA

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

जगप्रसिद्ध नामांकित ब्रॅण्डचे दर्जेदार होम अप्लायन्सेस एकाच छता खाली...
• फ्रीज • ए.सी. • वॉशिंग मशिन • एलईडी टीव्ही • होमथिएटर • मोबाईल • होम अप्लायन्सेस
सुलभ हप्त्यावर उपलब्ध 0% फायनान्स
COMPRO Systems & Services
HDB FINANCIAL SERVICES BAJAJ FINSERV
अंबर प्लाझा, एचडीएफसी बँके जवळ, स्टेशनरोड, अ.नगर. मो. ९३२५१०३०५०
PHILIPS LG Whirlpool SONY SAMSUNG KENSTAR JVC Electrolux

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, बुधवार दि. ०४.१२.२०२४ | अंक नं. २३१ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# किराणा माल व कॉस्मेटिक मटेरीयलच्या गोडावूनला 'भीषण आग'; रोकडसह सव्वाकोटीचे साहित्य 'खाक'

## नगर शहरातील बुरुडगाव रोडवर मंगळवारी रात्री उशिराची घटना





बुरूडगाव रोडवरील नक्षत्र लॉन शेजारी असलेल्या एस एस मार्केटिंगच्या गोडावूनला लागलेल्या आगीत जळून खाक झालेले साहित्य, जळालेल्या २०० व ५०० च्या नोटा, तसेच मालवाहतूक करणारे वाहन छायाचित्रात दिसत आहे. (छाया – अमित मन्यार)

नगर – शहरातील बुरूडगाव रोडवरील नक्षत्र लॉन शेजारी असलेल्या किराणा माल व कॉस्मेटिक मटेरीयलच्या गोडावूनला मंगळवारी (दि.३) मध्यरात्रीच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत सुमारे सव्वा कोटी पेक्षा जास्त रकमेचे नुकसान झाले असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या गोडावूनमध्ये सर्व साहित्यासह २ मालवाहतूक टेम्पो तसेच सुमारे ३.५ लाख ते ४ लाखांची रोकडही जाळून खाक झाली आहे.

बुरूडगाव रोडवर नक्षत्र लॉन शेजारी आनंद शिंगी व सचिन शिंगी यांच्या मालकीचे एस एस मार्केटिंग या फर्मचे गोडावून आहे. शिंगी बंधूंकडे ८ ते १० कंपन्यांच्या मालाच्या एजन्सी असून, या ठिकाणाहून ते संपूर्ण जिल्हाभरात किराणा दुकानांना या मालाचा पुरवठा करतात. मंगळवारी (दि.३) रात्री शिंगी बंधू व गोडावूनमध्ये काम करणारे कामगार हे गोडावून बंद करून घरी गेल्यानंतर रात्री १२ च्या सुमारास गोडावूनला अचानक मोठी आग लागली.

गोडावूनमधील बहुतांश साहित्य हे प्लास्टिकच्या आवरणात असल्याने आग काही वेळातच प्रचंड भडकली. परिसरातील नागरिकांनी शिंगी बंधूंना तसेच महापालिकेच्या अग्निशामक दलाला फोन करून आगीची माहिती दिली. अग्निशामक दलाची गाडी तातडीने घटनास्थळी दाखल झाली. त्यांनी पाण्याचा मारा सुरु करत आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र आग सारखी भडकत होती. त्यामुळे एमआयडीसीच्या अग्निशामक दलाला बोलावण्यात आले. आग आटोक्यात येत नसल्याने गोडावूनच्या पाठीमागील बाजूचे पत्रे जे.सी.बी. च्या सहाय्याने तोडून पाण्याचा मारा करण्यासाठी मार्ग काढावा लागला. दोन्ही दलांनी पहाटे पर्यंत सुमारे १३ ते १४ बंब पाण्याचा मारा करत पहाटे पर्यंत आग आटोक्यात आणली.

### सर्व काही जळून झाले भस्मसात

आगीने एवढे रौद्र रूप धारण केले होते की, या आगीत सर्व काही जळून भस्मसात झाले आहे. त्यात सुमारे ३.५ लाख ते ४ लाखांची रोकड, मालाने भरलेले अशोक लेलँड (क्र. एम एच १६ सी सी ८५ ८४) टाटा एस टेम्पो (क्र. एम एच १६ सी सी ६२५७) ही दोन्ही वाहने, गोडावूनमधील सर्व माल, टेबल, संगणक, प्रिंटर असे सुमारे १ कोटी २५ लाखांपेक्षा जास्त रकमेचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे, असे एस एस मार्केटिंगचे संचालक आनंद शिंगी यांनी सांगितले.

आग विझवण्यासाठी महापालिकेच्या माळीवाडा विभागाचे वाहन चालक सी.आर भांगरे, फायरमन पांडुरंग झिने, शुभम साठे, राहुल रोकडे, अमोल कुऱ्हाडे, एस. मिसाळ, सावेडी विभागाचे वाहनचालक सिकंदर वाकरे, फायरमन दिनेश शिंदे, अक्षय आव्हाड, अक्षय घुले आदींनी २ बंब व एमआयडीसीचे फायरमन नितीन जाधव, गणेश कदम, बालाजी ओव्हाळ, चालक प्रकाश शिंगाडे व महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीचे प्रशिक्षणार्थी यांनी प्रयत्न केले. पहाटे आग आटोक्यात आली तरी बुधवारी (दि.४) दुपारपर्यंत ती धुमसत होती.

# महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस गुरुवारी घेणार शपथ

## भारतीय जनता पार्टीच्या विधिमंडळ गटनेतेपदी एकमताने निवड



मुंबई – महायुती सरकारचा शपथविधी गुरुवारी (दि. ५) सायंकाळी ५ वाजता मुंबईतील आझाद मैदानावर पार पडणार आहे. देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडणार आहे. यावेळी अजित पवार आणि एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्री पदाची तर काही आमदार मंत्रिपदाची शपथ घेणार आहेत.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर ११ दिवसांनी महाराष्ट्राच्या नव्या मुख्यमंत्र्यांच्या नावाची घोषणा झाली. भाजपच्या विधीमंडळ पक्षाचा नेता निवडीसाठी भाजपचे केंद्रीय निरीक्षक विजय रुपाणी आणि निर्मला सीतारामन यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत विधीमंडळ पक्षाच्या गटनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.

या बैठकीत चंद्रकांत पाटील आणि सुधीर मुनगंटीवार यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. तर पंकजा मुंडे, प्रवीण दरेकर आणि रवींद्र चव्हाण, संजय कुटे यांनी अनुमोदन दिले. मुख्यमंत्री पदासाठी देवेंद्र फडणवीसांच्या नावाची घोषणा झाल्यानंतर आता महायुतीचे नेते आज दुपारी राज्यपालांना भेटून सरकार स्थापनेचा दावा करतील. महायुती सरकारचा मुख्यमंत्री कोण होणार, हा सस्पेन्स अखेर बुधवारी संपला. उद्या सरकार स्थापन होणार असून मुख्यमंत्र्यांसह दोन उपमुख्यमंत्री शपथ घेतील. यासोबतच काही आमदार देखील मंत्रिपदाची शपथ घेणार आहेत.

भाजपचे चंद्रशेखर बावनकुळे, चंद्रकांत पाटील, पंकजा मुंडे, गिरीश महाजन, आशिष शेलार, रवींद्र चव्हाण, अतुल सावे, सुधीर मुनगंटीवार, नितेश राणे, गणेश नाईक, मंगल प्रभात लोढा, राहुल नार्वेकर, अतुल भातखळकर, शिवेंद्रराजे भोसले, गोपीचंद पडळकर, माधुरी मिसाळ, राधाकृष्ण विखे पाटील, जयकुमार रावत हे आमदार मंत्रिपदाची शपथ घेण्याची शक्यता आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे धनंजय मुंडे, छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, दिलीप वळसे पाटील, आदिती तटकरे आणि धर्मराव बाबा आत्राम हे उद्या शपथ घेतील असे सांगण्यात येत आहे. तर शिवसेनेकडून दीपक केसरकर, उदय सामंत, शंभूराज देसाई, गुलाबराव पाटील हे शपथ घेतील, अशी माहिती आहे.

# मद्यधुंद चालकाने टेम्पोची धडक दिल्याने केडगाव येथील ३ वर्षीय बालकाचा मृत्यू

## इंडस्ट्रियल एरिया गेट जवळील घटना, मद्यधुंद चालक, क्लीनरवर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल



स्वराज महारनवर (मयत)

नगर – पुण्याहून नगर कडे भरधाव वेगात येणाऱ्या टेम्पोने रस्ता ओलांडण्याकरिता रस्त्याच्या कडेला थांबलेल्या महिलेस धडक दिल्याने महिलेच्या हातातील तीन वर्षाचा मुलगा खाली पडून त्याचा मृत्यू झाल्याची घटना नगर पुणे रोडवरील केडगाव इंडस्ट्रियल एरिया जवळ रॉयल बुलेट शोरुम समोर मंगळवारी (दि.३) सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास घडली. स्वराज संभाजी महारनवर (वय ३) असे मयत बालकाचे नाव आहे.

याबाबत संभाजी रामदास महारनवर (रा. शिक्षक कॉलनी, मोहिनीनगर, केडगाव) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी वाहन चालक शंकर उर्फ शेखर राघू मोरे, क्लीनर चंद्रकांत दत्तात्रय जपकर (दोघे रा. नेप्ती, ता.) यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना वाहनासह ताब्यात घेतले आहे. हे दोघेही मद्यधुंद अवस्थेत असल्याचे समोर आले आहे. फिर्यादी संभाजी हे रेल्वे स्टेशन वर हमाली काम करतात तर त्यांची पत्नी कल्याणी महारनवर ही तिच्या तीन वर्षाच्या लहान मुलास घेऊन केडगाव इंडस्ट्रियल एरिया येथील कंपनीत कामाला जाते. मंगळवारी (दि.३) संध्याकाळी काम सुटल्यानंतर ती महिला तिच्या समावेश असलेल्या मनीषा येळमकर, कविता लोखंडे, योगेश लोखंडे, राणी आंधळे, सुषमा येवले (सर्व रा.केडगाव) यांच्यासह घरी जाण्याकरिता निघाल्या.



केडगाव इंडस्ट्रियल एरिया जवळ ३ वर्षीय बालकाच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेला टेम्पो.

त्या केडगाव इंडस्ट्रियल एरिया बाहेर आल्या व रस्ता ओलांडण्याकरिता रॉयल एनफिल्ड शोरूमच्या समोरील गेट समोर उभ्या राहिल्या असता पुण्याच्या दिशेकडून नगरकडे भरधाव वेगात येणाऱ्या मारुती सुझुकी कंपनीचा सुपर कॅरी टेम्पोने (क्र.एम एच १२ डब्ल्यू एक्स २०५९) कल्याणी महारनवर यांच्या हाताला धडक दिली. त्यामुळे त्यांच्या हातातील त्यांचा तीन वर्षाचा मुलगा स्वराज हा खाली पडून गंभीर जखमी झाला. अपघात होतात तेथील नागरिकांनी स्वराज यास तात्काळ नगरमधील खाजगी रुग्णालयात नेले, तेथील डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी त्याला दुसऱ्या रुग्णालयात नेण्यास सांगितले. त्यानंतर स्वराज यास जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी मुलगा स्वराज यास उपचारापूर्वीच मयत घोषित केले.

त्यानंतर महारनवर यांनी केडगाव इंडस्ट्रियल एरियामधील रॉयल एनफिल्ड शोरूमच्या गेट समोरील लोकांकडे चौकशी केली असता त्यांना टेम्पोचा क्रमांक व चालक शंकर राघू मोरे व त्याच्यासोबत क्लीनर चंद्रकांत दत्तात्रय जपकर अशी त्यांची नावे असल्याचे समजले. त्या दोघांनीही मद्य प्राशन केलेले असल्याचे नागरिकांनी सांगितले. त्या टेम्पोत दारूच्या बाटल्याही आढळून आल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी संभाजी महारनवर यांनी दिलेले फिर्यादीवरून टेम्पो चालक शंकर मोरे आणि क्लीनर चंद्रकांत जपकर यांच्याविरुद्ध मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम १८५, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०५, ११०, ३२४ (४), ३२४ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी टेम्पो चालक शंकर मोरे व क्लीनर चंद्रकांत जपकर यांना टेम्पो सह ताब्यात घेतले आहे.

Career Ki Shuruwat DiSHA ke saath
2 लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी अनुभवलेला कोर्स
DCGA Diploma Course in Graphics & Office Automation
JUST IN 8900/-
GET READY FOR YOUR JOB
JOIN TODAY
MS-OFFICE | TALLY PRIME | GST | CORELDRAW | ILLUSTRATOR | PHOTOSHOP | WEB PAGE DESIGNING | BASIC HARDWARE
Duration : 6 Months
Delhi Gate Branch 9371051769
Old ST stand Branch 9371151769
Pipeline Branch 7447761769

डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine) DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
* पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
* डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
* सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
एशियन नोबल हॉस्पिटल प्रेमदान चौक, अ.नगर रोज दुपारी १ ते ५ या वेळेत

SONI TILES AND MARBLE INDUSTRIES Since 1965
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar.
Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँड मार्बल इंडस्ट्रिज

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात दिनांक : 28 नोव्हेंबर ते 05 डिसेंबर 2024
SINGHAM AGAIN 09:00 AM I 02:00 PM 04:45 PM I 10:00 PM
THE SABARMATI REPORT 11:40PM I 07:30 PM
BHOOL BHULAIYAA 3 09:45 AM I 04:00 PM 10:20 PM
KAL HO NAA HO 10:15 PM
CHHATRAPATI SAMBHAJI MAHARAJ 09:00 AM I 12:45 PM 04:45 PM I 07:00 PM
MOANA 2 (3D) HIN-12:15 PM I 08:00 PM ENG-02:30 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
bookmyshow CONNPLEX SMART THEATRE bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar Mo. 6353564618 / 7790094001

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## मन करा रे प्रसन्न... सर्व सिद्धीचे कारण...

संकटकाळात कोणीच मदतीला येत नाही, तेव्हा मी माझ्या मनाला साक्षी ठेऊनच सत्य असत्याचा सारासार विचार केला. मग बाकीचे लोक काय म्हणतात, त्याकडं अजिबात लक्ष दिले नाही, असं आपल्यावरील आत्मभर अभंगामध्ये तुकाराम महाराजांनी म्हटलं आहे.

आपल्या जवळचं दुसऱ्याला देण्यातून, माफ करण्यातून स्वतःच्या मनाला अद्भूत समाधान मिळतं. शिवाय निसर्गाच्या सान्निध्यात 'नाही गुण दोष अंगा येत' असा स्वानुभवही त्यांनी सांगितला.

आपलं मन हेच सर्व गोष्टींसाठी कारणीभूत असतं. सुखालाही आणि दुःखालाही. मन प्रसन्न ठेवलं तर आयुष्यात आपल्याला हवं ते मिळू शकतं. आपण समाधानी राहू शकतो.




मन करा रे प्रसन्न - सर्व सिद्धीचे कारण असे मानसिक आरोग्य सांगणारे अनेक अभंग संत तुकाराम महाराजांनी लिहिले आहेत. जे सदासर्वकाळ सर्वांना मार्गदर्शक ठरणारे आहेत.



जगद्गुरु तुकाराम म्हणतात, ''सगळे व्यापताप चिंता व्यथा यांतून सुटका करून घ्यायची असेल तर हे मना, तू एक गोष्ट कर. ती म्हणजे मी पंढरीस जाईन अन् विठ्ठलाला पाहीन - पूजीन.

महाराज सांगतात मना तू हरिकिर्तनात टाळ्या वाजवत नाचावेस. यापेक्षा दुसरा आनंद नाही. त्यातच सर्व सुखाचं आगर सामावलं आहे.

## नेप्ती कांदा मार्केट परिसरात आढळला तरूणाचा मृतदेह

नगर - नेप्ती (ता. नगर) येथील कांदा मार्केट परिसरात तरूणाचा मृतदेह आढळून आला आहे. राहुल मुरलीधर तोडकर (वय ३५, माणिकदौंडी ता. पाथर्डी) असे मयत तरूणाचे नाव आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. राहुल मुरलधीर तोडकर हे नेप्ती कांदा मार्केट येथे बेशुध्द अवस्थेत आढळून आले. सोमवारी सकाळी ११ वाजता नागरिकांना हा प्रकार निदर्शनास आला. त्यांनी तत्काळ खासगी रूग्णवाहिकेतून राहुल यांना जिल्हा शासकीय रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी उपचार सुरू करण्याआधीच त्यांना मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते यांनी पथकासह घटनास्थळी भेट देत पंचनामा केला. मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. याप्रकरणी नगर पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार खंडेराव शिंदे करत आहेत.

## कारच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

नगर- मनमाड बायपास रस्त्यावर कारने दुचाकीला दिलेल्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला आहे. बाळासाहेब भिकाजी जाधव (वय ५७, पत्ता नाही) असे मयत दुचाकीस्वाराचे नाव आहे. सोमवारी (दि.२) सव्वा दहाच्या सुमारास ही घटना घडली. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात मसिर्डीस कंपनीच्या कारवरील (क्र. एमएच ०१ डीएक्स २१२४) अज्ञात चालकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विनोद रामा खुडे (वय ३८ रा. शिवाजीनगर, कल्याण रस्ता) यांनी फिर्याद दिली आहे. बाळासाहेब भिकाजी जाधव हे सोमवारी त्यांच्या दुचाकीवरून (क्र.एमएच १६ बीटी ०३५४) नगरकडून मनमाड दिशेने जात होते. त्याच वेळी कार चालकाने भरधाव वेगाने आणि बेजबाबदारपणे कार चालवत दुचाकीला धडक दिली. या धडकेत बाळासाहेब गंभीर जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाला. पोलीस उपनिरीक्षक परदेशी अधिक तपास करत आहेत.

## तरुणाची गळफास घेत आत्महत्या

नगर - नवनागापूरच्या चेतना कॉलनीत एका तरूणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. राहुल भिमराज पुंड (वय २६) असे आत्महत्या करणार्याक तरूणाचे नाव आहे. सदरची घटना सोमवारी (दि.२) दुपारी पावणे तीन वाजण्याच्या सुमारास घडली.

राहुल यांनी गळफास घेतल्याचे लक्षात येताच त्यांचा भाऊ आकाश पुंड यांनी त्यांना उपचारासाठी येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल केले. मात्र, तेथील डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्यांना मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांनी घटनास्थळी भेट दिली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून अधिक तपास पोलीस अंमलदार आव्हाड करत आहेत.

# मतदार अक्कलमारीसाठी खर्च केलेल्या रकमेच्या बदल्यात सत्ता टक्केवारीची मोठ्या प्रमाणात वसुली

### लोकशाही संरक्षण कायद्यासाठी पीपल्स हेल्पलाईन संघटना प्रयत्नशील

नगर - मतदार अक्कलमारीतून सत्ता टक्केवारी फोफावली असून, मतदार अक्कलमारीसाठी खर्च केलेल्या रकमेच्या बदल्यात सत्ताटक्केवारी फार मोठ्या प्रमाणात वसूल केली जात असल्याचा आरोप पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने करण्यात आला आहे. इतर वेळेला कोणतेही सामाजिक काम न करणारे लोक निवडणुकीमध्ये वारूळातून आलेल्या मुंग्यांसारखे धावपळ करत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.



भारतात केंद्र सरकार, राज्य सरकार व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सेवेत असलेल्या नोकरशाहीचे पगार व्यतिरिक्त विकास कामांसाठी अंदाजपत्रकात तरतूद केलेल्या रकमेपैकी ३० टक्के रक्कम ही सत्ता टक्केवारीच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी आणि सरकारी नोकर भ्रष्टाचाराच्या मार्गाने घरी घेऊन जात असल्याचाही गंभीर आरोप संघटनेने केलेला आहे. देशभरात कितीतरी लाखो कोटींच्या पुढे हा टक्केवारीचा भ्रष्टाचार जातो. आमदारकीच्या निवडणुकीसाठी सत्तापेंढारी ५० कोटी पेक्षा जास्त रक्कम खर्च करतात, तर खासदारकीच्या निवडणुकीमध्ये ही रक्कम दुप्पट होते. परंतु निवडून आलेले आमदार, खासदार किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांचे नगरसेवक निवडणुकीमध्ये खर्च केलेल्या रकमेचे दहा ते पंधरा पट रक्कम जनतेच्या पैशावर डल्ला मारून वसुल करतात. त्यामुळे निवडून आलेले लोक अचानक श्रीमंत होऊन मोठी प्रतिष्ठा मिळतात. त्यामुळे लोकांचे काम न करता सुद्धा फक्त मतदार अक्कलमारीच्या तंत्राचा वापर करून संसदीय लोकशाहीमध्ये सत्ता, प्रतिष्ठा आणि संपत्ती मिळण्याचे साधन सत्तापेंढाऱ्यांना उपलब्ध झाले असल्याचे म्हंटले आहे.

संसदीय लोकशाही आणि त्यावर नियंत्रण करणारी आम लोकशाही या दोन्ही ठिकाणी उन्नत चेतनेचा अभाव असल्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात देखील सामाजिक आणि दुबळ्या घटकांना स्वातंत्र्याची फळे खऱ्या अर्थाने मिळाली नाहीत. त्यासाठी देशातील आम लोकशाही प्रबळ केली पाहिजे आणि म्हणून लोकशाही संरक्षण कायदा आणण्यासाठी मोठ्या संख्येने वकील पुढे येत असल्याचे ॲड. रमेश कराळे आणि ॲड. भाऊसाहेब नवले यांनी स्पष्ट केले आहे.

भारतातील आमदार त्यांच्या टर्म नंतर खासदार झाले, तर पुढे आमदार व खासदारकीचे दोन्ही पेन्शन त्यांना मिळतात. या रकमेतही त्यांनी भरघोस वाढ करुन घेतली आहे. त्यामुळे लोकशाही संरक्षण कायद्याद्वारे लोकप्रतिनिधीसाठी वन मॅन वन पेन्शन योजना राबवली गेली पाहिजे असा प्रस्ताव ॲड. किसनराव मोरे यांनी मांडला आहे.

देशातील घराघरात मी, माझे, मला आणि आम्ही, आमची, आम्हाला या पद्धतीमुळे दिव्यांग कुटुंब पद्धती सर्रास राबवली जात आहे. त्यामुळे आपण सर्व, आपणा सर्वांसाठी आणि आपणा सर्वांचे असे बाळकडू प्रत्येक कुटुंबातील घरातील सर्वांना मिळाले पाहिजे. तरच मनुने लादलेली दिव्यांग कुटुंब पद्धती नष्ट होऊ शकणार असल्याचे ॲड. कारभारी गवळी यांनी म्हंटले आहे.

भारतातील शिक्षण संस्थांमध्ये शिकून सत्तेच्या जागेवर गेलेल्या अधिकारी, पदाधिकाऱ्यांकडे मी, माझे, मला किंवा आम्ही, आमचे, आम्हाला या पलीकडे वागण्याची पद्धत उपलब्ध झाली नाही. त्यामुळे सर्वत्र अनागोंदी आणि भ्रष्टाचार माजला आहे. या देशातील प्रत्येक शिक्षण संस्थेत आपण सर्व, आपणा सर्वांचे आणि आपणा सर्वांसाठी अशी शिक्षण पद्धती अमलात आणली पाहिजे असाही लोकशाही संरक्षण कायदा आणण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या वकिलांचा आग्रह आहे.

# ईव्हीएम विरोधात जिल्ह्यात जनआंदोलनाची दिली हाक

### राज्यभरात राबवणार स्वाक्षरी मोहीम, वंचित बहुजन आघाडीचा एल्गार

नगर - राज्यभरात ईव्हीएम विरोधी जनआंदोलनाची हाक देण्यात आली आहे. स्वाक्षरी मोहिमेपासून सुरुवात करून टप्पा टप्प्याने हे आंदोलन तीव्र करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर नगर जिल्ह्यातही वंचित बहुजन आघाडी ईव्हीएम विरोधी आंदोलन राज्य महासचिव प्रा. किसन चव्हाण, राज्य प्रवक्ते ॲड. अरुण जाधव, दक्षिण जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे.

विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात ईव्हीएमवर संशयाचे वातावरण निर्माण झालेले असताना, पुणे येथे आघाडीच्या राज्य कार्यकारिणी बैठकीत आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला. १६ डिसेंबरपर्यंत राज्यात ईव्हीएम विरोधी स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येणार आहे.

आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी व्हिडिओच्या माध्यमातून राज्यातील मतदारांना ईव्हीएम विरोधात स्वाक्षरी मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. २००४ पासून ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली ईव्हीएम विरोधात आंदोलन करण्यात येत आहे. ईव्हीएमच्या विरोधात न्यायालयीन लढाई सुद्धा ते लढत आहेत. पत्रकार परिषदेच्या माध्यमातून ईव्हीएम वापरामधील मधील अनेक घोळ त्यांनी माध्यमासमोर मांडले आहेत. ईव्हीएमच्या विरोधात आरपारची लढाई लढण्याचा निर्णय वंचित बहुजन आघाडीने घेतला असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.



ईव्हीएम विरोधातील जनआंदोलनाची माहिती देताना वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी.

या ईव्हीएम विरोधातील आंदोलनात शहर जिल्हाध्यक्ष हनीफ शेख, शहर उपाध्यक्ष प्रवीण ओरे, शहर महासचिव अमर निर्भवणे, जिल्हा संघटक प्रसाद भिवसने, जिल्हा सल्लागार जे.डी. शिरसाठ, गणेश राऊत, बबलू भिंगारदिवे, आसिफ शेख, नगर तालुका अध्यक्ष मारुती पाटोळे, शेवगाव तालुका अध्यक्ष प्यारेलाल शेख, कर्जत तालुकाध्यक्ष पोपट शेटे, श्रीगोंदा अध्यक्ष संतोष जवंजाळ, युवा जिल्हाध्यक्ष सोमनाथ भैलुमे त्याचबरोबर सर्व जिल्हा, तालुका, शहर आणि युवा पदाधिकारी ही मोहीम आपापल्या विभागात राबवणार आहेत. सर्व मतदारांनी या मोहिमेत सहभागी होऊन ईव्हीएमला हद्दपार करण्यासाठी हातभार लावण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांनी केले आहे.

श्रीरामपूरचे माजी नगराध्यक्ष

## अनिल कांबळे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष अनिल (बाबासाहेब) शामराव कांबळे (वय ६६) यांचे ४ डिसेंबर रोजी दुपारी २:४० वा. अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा ५ डिसेंबर रोजी सकाळी ९ वा. वढणेवस्ती, वॉर्ड नं.७, श्रीरामपूर येथील निवासस्थानापासून निघेल.

त्यांच्या पश्चात पत्नी, तीन भाऊ, एक मुलगा, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. अनिल कांबळे हे शिवाजी, सुनील व उदय कांबळे यांचे बंधू, कुणाल कांबळे यांचे वडील, माजी नगरसेविका भारतीताई कांबळे यांचे पती, समीर, तारक, महेश, गौरव व अमोल कांबळे यांचे चुलते होत.

## दशरथ कोकाटे यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी दशरथ सखाराम कोकाटे (वय ७५) यांचे ४ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर गावातील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे.

## लक्ष्मीबाई रंगा यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - येथील रहिवासी लक्ष्मीबाई भुमय्या रंगा (वय ७५, रा.आदर्शनगर, कल्याण रोड, अ.नगर) यांचे ३ डिसेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. विजय, गणेश रंगा, उमा दिकोंडा यांच्या त्या मातोश्री होत.

## सुमनबाई पानमळकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर - येथील रहिवासी सुमनबाई रंगनाथ पानमळकर (वय ७५, रा.नागरदेवळे) यांचे ४ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. नागरदेवळे गावठाण अमरधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, ३ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सरपंच राम पानमळकर यांच्या त्या चुलती होत.

## शकुंतला बोरसे यांचे अल्पश: आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील शकुंतला शांताराम बोरसे (वय ७९) यांचे अल्पश: आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सूना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. पत्रकार राजेंद्र बोरसे यांच्या मातोश्री, तुषार, विनोद व ललित बोरसे यांच्या चुलती, मयुर बोरसे यांच्या आजी होत.

## विनापरवाना फ्लेक्स बोर्ड लावल्याप्रकरणी आणखी तिघा जणांवर गुन्हे दाखल

नगर - शहरातील कोर्ट गल्ली, कल्याण रोड परिसरात विनापरवाना अनधिकृत फ्लेक्स बोर्ड लावल्याप्रकरणी महापालिकेने संबंधितांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. महापालिकेचे प्रभाग अधिकारी राकेश कोतकर यांच्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोमवारी सावेडी प्रभाग कार्यालयाने पाच जणांवर अनधिकृत फ्लेक्स बोर्ड प्रकरणी गुन्हा दाखल केला होता. दुसऱ्याच दिवशी माळीवाडा प्रभाग कार्यालयानेही तिघांवर कारवाई करत गुन्हा दाखल केला आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अनधिकृत फ्लेक्स बोर्ड हटवण्याच्या मोहिमेअंतर्गत महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने शहरात पाहणी केली. यावेळी कोर्ट गल्लीतील स्टाईल वर्ल्ड मेन्स वेअर, आराधना इलेक्ट्रॉनिक्स, तसेच कल्याण रोडवर ब्रिजजवळ महाराष्ट्र फर्निचर गादी कारखाना या नावाचे तीन फ्लेक्स बोर्ड विनापरवाना लावण्यात आल्याचे आढळले. हे फ्लेक्स बोर्ड काढून जमा करण्यात आले. या प्रकरणी अज्ञात तिघा व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सुमनबाई भावसार यांचे वृद्धाकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील सुमनबाई वसंतराव भावसार (दौंडे) (वय ८५) यांचे ३ डिसेंबर रोजी वृद्धाकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, दिर, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

संजय भावसार (दौंडे) व विजय भावसार (दौंडे) यांच्या मातोश्री, रामचंद्र भावसार व राजेंद्र भावसार यांच्या भावजई, सागर रामचंद्र भावसार यांच्या चुलती, आकाश व आदित्य भावसार यांच्या आजी होत. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# आ.संग्राम जगताप यांना मंत्रीपद मिळण्यासाठी ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे आरती

नगर - आमदार संग्राम जगताप यांना मंत्रीपद मिळावे यासाठी ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळ व गंगाधर शास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय व हॉस्पिटल यांच्या वतीने आरती करण्यात आली. यावेळी संचालक ज्ञानेश्वर रासकर, सचिव डॉ. विजय भंडारी, वैशाली ससे, प्राचार्य लोंढे, उपप्राचार्य सुरज ठाकूर, आर एम ओ समीर होळकर, प्रतिभा भारदे आदींसह डॉक्टर, अध्यापक, विद्यार्थी आदी उपस्थित होते.


आमदार संग्राम जगताप यांना मंत्रीपद मिळावे यासाठी ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळ व गंगाधर शास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय व हॉस्पिटल यांच्या वतीने आरती करण्यात आली.

संचालक ज्ञानेश्वर रासकर म्हणाले कि सलग तीन पंचवार्षिक निवडणुकीत आमदार संग्राम जगताप हे निवडून आले आहेत त्यामुळे यंदाच्या मंत्रिमंडळ विस्तारात त्यांचे मंत्रिपद हे निश्चित आहे. आमदार जगताप यांचेकडे विकासाचे व्हिजन असल्यामुळेच जनतेने त्यांना भरभरून मतांनी विजयी केले आहे. आमदार जगताप यांच्या रूपाने मंत्रिपद मिळाले तर संपूर्ण जिल्ह्यात विकासाची गंगा सुरु राहील असे रासकर यांनी सांगितले यामुळेच आज आम्ही श्री विशाल गणेश मंदिर येथे आरती केली असल्याचे ते म्हणाले. तसेच यावेळी सचिव डॉ. विजय भंडारी यांनी आपले मनोगत व्यक्त करून आमदार संग्राम जगताप यांना मंत्रिपद मिळावे यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

# आ.संग्राम जगताप यांना मंत्रीपद मिळण्यासाठी भिंगार येथील शुक्लेश्वर मंदिरात 'महाअभिषेक'

नगर - नगर शहर विधानसभा मतदार संघात तिसऱ्यांदा सलग निवडून आलेले आमदार संग्राम जगताप यांना मंत्रीपद मिळण्यासाठी भिंगार येथील ग्रामदैवत शुक्लेश्वर मंदिरात महाअभिषेक घालण्यात आला. शुक्लेश्वर मंदिरात विधीवत पूजा पार पडली.

यांप्रसंगी भिंगार राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष संजय सपकाळ, युवक भिंगार शहराध्यक्ष शिवम भंडारी, अनिल तेजी, किशोर उपरे, गणेश उपरे, विशाल (अण्णा) बेलपवार, दीपक राहिंज, विशाल राहिंज, आनंद क्षीरसागर, रत्नदीप गारुडकर, प्रमोद जाधव, दिनेश लंगोटे, योगेश देवतरसे, करण पाटील, रवी नामदे आदी उपस्थित होते.


संग्राम जगताप यांना मंत्रीपद मिळण्यासाठी भिंगार येथील ग्रामदैवत शुक्लेश्वर मंदिरात महाअभिषेक घालण्यात आला.

संजय सपकाळ म्हणाले की, संग्राम जगताप हे युवकांचे नेतृत्व असून, त्यांनी शहर व उपनगरांचा विकासात्मक कायापालट केला आहे. त्यांच्या माध्यमातून शहराला म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे. विकासाचे व्हिजन ठेऊन त्यांनी केलेल्या कामाला यापुढे अधिक गती मिळणार आहे. तर त्यांच्या माध्यमातून मेट्रो सिटीचे स्वप्न साकारले जाणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

मंत्री पदाची संधी मिळावी ही सर्वसामान्य नगरकरांची इच्छा आहे. अनेक वर्षापासून शहराला मंत्री मंडळात स्थान मिळालेले नाही. सलग तिसऱ्यांदा निवडून आलेले आ. जगताप यांना मंत्रीपद मिळावे ही सर्वांची इच्छा असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

शिवम भंडारी म्हणाले की, शहराच्या सर्वांगीन विकासासाठी आ. जगताप यांना मंत्रीपद मिळणे आवश्यक आहे. त्यांनी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन शहरातील विकास कामे मार्गी लावली. विकासात्मक व्हिजन असलेले आ. जगताप यांची मंत्रीमंडळाला देखील चांगली मदत होणार असून, शहराच्या इतिहासात सर्वाधिक निधी आणणारे आमदार

# गृहिणी

## आरोग्य

### टूथब्रश कधी बदलावा?

टूथब्रश वेळेवर बदलला नाही तर त्याचा तुमच्या आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो. जुने आणि जीर्ण ब्रश बॅक्टेरियाचे घर बनतात, ब्रशेस न बदलल्यामुळे अनेक आजार जडतात. जुन्या थूथब्रशेसवर जमा झालेल्या बॅक्टेरियामुळे तोंडाला संसर्ग होऊ शकतो. ब्रश वेळेवर न बदलल्याने हिरड्यांना सूज आणि वेदना होऊ शकतात. दंतवैद्यांच्या मते दर तीन महिन्यांनी ब्रश बदलला पाहिजे. म्हणजे संभाव्य आजारांचा धोका टळेल.

## पाककला

### कोहळ्याचे खमंग वडे

**साहित्य :** अर्धी वाटी चणाडाळ, पाव वाटी मुगडाळ, पाव वाटी उडीदडाळ, दोन टी स्पून तांदूळ, कोहळा पाव किलो किसून, हिरव्या मिरच्या ४, मीठ, जिरे व ओवा यांची भाजून केलेली पूड, हळद, अद्रकाचा तुकडा

**कृती :** डाळी आणि तांदूळ धुवून घ्या व कोहळ्याच्या किसामध्ये ३ तास भिजत घाला. पाणी टाकण्याची गरज पडत नाही, कोहळ्याच्या पाण्यात डाळी भिजतात. भिजत घातलेले मिश्रण मिक्सर जार मध्ये घाला. त्यात मिरच्या, अद्रक, जिरेओवा पूड हे सगळं घालून जाडसर भरडून घ्या. हे मिश्रण एका बाऊलमध्ये घेऊन त्यात चवीप्रमाणे मीठ, चिमूटभर हळद, बारीक चिरलेली कोथिंबीर घालून छान मिक्स करून घ्या. आता चमच्याने किंवा हाताने गरम तेलात सोडून कुरकुरीत वडे तळून घ्या.

## वास्तू

### आंघोळीच्या पाण्यात हळद टाकल्याचे होणारे लाभ

वास्तुशास्त्रानुसार देवगुरु गुरुला हळद अतिशय प्रिय आहे. त्यामुळे पाण्यात हळद टाकून आंघोळ केल्याने कुंडलीत गुरु ग्रहाची स्थिती मजबूत होते. यासोबतच भगवान विष्णूचा विशेष आशीर्वाद प्राप्त होतो, ज्यामुळे घरात सुख-शांती राहते. याशिवाय जीवनात प्रगती होण्याची शक्यताही हळूहळू वाढते. लक्ष्मी माताही प्रसन्न राहते.

## सल्ला

आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रम णात असते, ज्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते.

## सौंदर्य

चेहऱ्यावरील टॅनिंग दूर करण्यासाठी एका बाऊलमध्ये दही, बेसन, हळद, कोको पावडर घ्यावी हे चांगल्या प्रकारे मिक्स करून चेहऱ्यावर लावावे. यामुळे चेहऱ्यावरील टॅनिंग दूर होण्यास मदत होते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

गुरुवार, दि. ५ डिसेंबर २०२४

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, मार्गशीर्ष शुक्लपक्ष, उ.षा. १७।२७, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : आपल्या संपर्कात येणाऱ्या लोकांच्या वर्तनामुळे आपणास संताप येण्याची शक्यता आहे.

**वृषभ** : योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल. काही नवीन संधी मिळतील.

**मिथुन** : आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. पोरकटपणा करणे टाळाल. त्यामुळे फायदा होईल.

**कर्क** : आपला दृढनिश्चय आणि आत्मविश्वास अधिक चांगल्या रितीने कार्य करण्यास आपली मदत करेल.

**सिंह** : गंभीर आणि योजनाबद्ध प्रयत्नांनी आपणास यश आणि आनंद मिळेल. शांत राहाण्याचा प्रयत्न कराल.

**कन्या** : आपण जे करण्याची इच्छा ठेवता ते सुरुवातीपासून ठरवून घ्याल. घरातील वातावरण आनंददायी राहील.

**तूळ** : योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल. दिवस आनंदात जाईल.

**वृश्चिक** : आपल्याला कार्यालयामध्ये अथवा घरामध्ये आज थोडा मनस्ताप होण्याचा योग आहे. वाहनात बिघाड होईल.

**धनु** : मागील उधारी उसनवारी वसुल होईल. बाहेरचे पदार्थ, हॉटेलिंग वगैरे जपून केल्याने त्रास होईल.

**मकर** : मागील काही दिवसांपासून जे आपण नियोजन केलेले आहे ते आज फळास येईल. उपकरणे बिघडण्याचा संभव आहे.

**कुंभ** : बळात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील. महत्त्वाच्या कामांसाठी श्रम करावे लागतील. कुटुंबियांचा सहवास लाभेल.

**मीन** : आर्थिक विषयांमध्ये नुकसान होईल. मन अस्थिर राहिल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!


मुलगा : पप्पा, आपले आडनाव वाघ आहे तरी पण तुम्ही मम्मीला का घाबरता?
पप्पा : अरे बेटा, तुझ्या मम्मीचे माहेरचे आडनाव वाघमारे आहे!

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* 'बुशमॅन' चित्रे काय आहेत? - जीवनाचे विविध रंग खडकावर चित्रीत करणे
* घानाला त्याचे नाव कसे प्राप्त झाले? - स्थानिक राजांच्या नावावरुन पडले आहे
* स्वत:चे चलन प्रचलनात आणणारे आफ्रिकेतील पहिले साम्राज्य कोणते? - ॲकमस देश
* कोणत्या शहरामध्ये मध्ययुगीन टॉवर स्तंभ आहे? - जुन्या बाकू शहरामध्ये

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०६४ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७०६३ चे उत्तर



**आडवे शब्द :** १) सुरक्षित; रक्षण केलेले ५) आपत्ती; बला; विपदा ८) पलीकडची बाजू; पैलतीर ९) बिल्ला १०) अंगावरून वारे जाणे; पक्षघात; अर्धांगवायू १२) खोड; दुर्गुण; वाईट सवय १४) अनेक रस्ते एकत्र येतात ते ठिकाण; जकात वसुलीची जागा १५) रुग्णालय; हॉस्पिटल १६) कुस्तीगीर; पहिलवान १७) बाण; तीर १८) सरपटणारा एक जीव २०) नाजूक; सुकुमार; कोमल २२) लग्न झालेल्या स्त्रीचे आईवडिलांचे घर २३) घोडे जोडलेले देवादिकांचे वाहन २४) सशक्त; बलवान; शक्तिमान

**उभे शब्द :-** १) हातपाय पसरून; सर्व अंग टेकून २) एक रंग; एक रत्न ३) आशय; हेतू; स्वार्थ ४) थेट; कोठेच न थांबता ५) काम बंद आंदोलन ६) सोवळ्याचे रेशमी वस्त्र ७) एकसारखे लक्ष लावून; चकितपणाने ११) पुन्हा ; पुन्हा १३) अगदी गरीब; निर्धन १४) पुरुषाचे एक आदरार्थी टोपणनाव १५) सीतापती रामाचे वडील १६) स्मशानभूमी १९) मातीचे उथळ व पसरट असे एक पात्र २१) आठवड्यातील कोणताही दिवस; घाव; जखम २२) महिना; माहे; माह

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : मनाची शांतता म्हणजे सुखी जीवन होय.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### जुनी फोटोग्राफी कशी केली जायची?

आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण कॅमेऱ्यात कैद करण्याची धडपड करणारे अनेक लोक आपण आजूबाजूला पाहत असतो. कुठल्यातरी फॅन्सी ठिकाणी जाऊन प्री-वेडिंग फोटोशूट करणाऱ्या जोडप्यांचा आणि फोटोग्राफर्सचाही सगळीकडे सुळसुळाट आहे. पण मुळात हा कॅमेरा आला कसा माहीत आहे? सुरुवातीच्या काळात फोटोग्राफी हा अत्यंत वेळकाढू आणि अंगमेहनतीचा प्रकार होता. धातू आणि लाकडापासून बनवलेले कॅमेरे काचेच्या किंवा धातूच्याच प्लेटवर फोटो घ्यायचे. कधी कधी सगळी उपकरणं वाहून नेण्यासाठी प्राण्यांचा वापर करावा लागायचा! पण १८८८ साली जॉर्ज इस्टमन या अमेरिकन संशोधकानं शोधलेल्या फिल्ममुळे कॅमेराविश्वात क्रांती घडली. ही 'कोडॅक मोमेंट' पुढच्या सगळ्या संशोधनाची पायाभरणीच होती असं म्हणा ना!

२०व्या शतकाच्या सुरुवातीला आलेल्या 'कोडॅक ब्राऊनी' कॅमेऱ्यानं फोटोग्राफीच्या जगात लोकशाही आणली असं रॉयल फोटोग्रॅफिक सोसायटीचे महासंचालक डॉ. मायकल प्रिचर्ड म्हणतात. त्यानंतर कॅमेऱ्याच्या क्षेत्रात झालेले बदल आपण पाहिलेच आहेत. ब्लॅक अँड व्हाईट कॅमेऱ्यात रंग आले, फिल्म्स (ज्याला आपल्याकडे बहुधा 'रोल' म्हणायचे) जाऊन डिजिटल कॅमेरा आले. कॅमेरे नसते तर सध्याचं सेल्फीग्रस्त विश्व कदाचित उभं राहिलंच नसतं, नाही का? अर्थात, हे चांगलं की वाईट हे ज्यानं त्यानं आपापलं ठरवावं!


### महामूर्ख

विजयनगरमध्ये अनेकदा मनोरंजनाचे कार्यक्रम होत असत. प्रत्येक कार्यक्रमातील यशस्वी कलाकारांना पुरस्कार देण्याचीही व्यवस्था होती. तसेच तेनालीरामला दरवर्षी सर्वोत्कृष्ट मनोरंजनाचा पुरस्कार मिळत असे. त्याच्या हुशारी आणि बुद्धिम त्तेच्या जोरावर त्याची दरवर्षी 'महान मूर्ख' म्हणून निवडही होत असे. अशाप्रकारे तेनाली राम दरवर्षी एकटाच दोन पुरस्कार मिळवायचा. या कारणास्तव इतर दरबारी तेनालीरामचा अत्यंत तिरस्कार करायचे. यंदा होळीच्या दिवशी फक्त तेनालीराचे नाव काढायचे, असा निर्णय इतर दरबारींनी घेतला होता. त्यासाठी त्यांनी एक युक्तीही शोधून काढली होती. तसेच होळीच्या दिवशी तेनालीरामला भांग पाजण्यात आली. त्यामुळे होळीच्या दिवशी तेनालीराम भांगाच्या प्रभावाखाली घरीच राहिले. दुपारी जेव्हा तेनालीराला जाग आली तेव्हा ते घाबरले आणि घाबरून ते राजदरबारात गेले. ते राजदरबारात पोहोचेपर्यंत उत्सवातील निम्म्याहून अधिक कार्यक्रम पूर्ण झाले होते. राजा कृष्णदेव राय यांनी त्याला पाहताच राग आला. राजाने तेनालीराम ला मूर्ख म्हटल्यावर सर्व दरबारी आनंदी झाले. तोही राजाशी सहमत झाला आणि म्हणाला, ''महाराज तुम्ही अगदी खरे बोललात. तेनालीराम हा मूर्खच नाही तर महा मूर्ख आहे. तेनालीरामने सर्वांचे हे ऐकून हसून महाराजांना म्हटले,

''धन्यवाद महाराज, तुमच्या मुखाने मला महामूर्ख ठरवून तुम्ही माझ्यासाठी आजचे सर्वात मोठे बक्षीस निश्चित केले आहे.'' तेनालीराम यांच्याकडून हे ऐकताच दरबारींना त्यांची चूक लक्षात आली. पण आता ते काय करू शकत होते? कारण त्यांनी स्वतः तेनाली रामला महामूर्ख म्हटले होते. होळीच्या निमित्ताने तेनाली रामने दरवर्षीप्रमाणे पुन्हा एकदा 'महामूर्ख'चा पुरस्कार पटकावला.

तात्पर्य : कुणाची प्रगती पाहून आपण त्याचा द्वेष करु नये.

## रहमते दर्शन (भाग - १)



करते, तो यह आश्चर्य की बात होती। जब वे शिक्षा के प्रारम्भिक स्तर पर ही थे, उस समय ही वे सूफ़ी गुलाम मुस्तफा 'तबस्सुम' की संगत और उनके उत्साह वर्धन से इस ओर अपने-आप विशिष्ट रूप से आगे बढ़े। दर्शनसिंह जी ने काव्य में रुचि और साहित्य की समझ के अलावा उनसे उर्दू और फ़ारसी का छन्द शास्त्र भी सीखा। उन्होंने अपने अंग्रेज़ी के प्रोफेसर, एरिक डिकेंसन् से अंग्रेज़ी शायरी के पिंगल का भी ज्ञान प्राप्त किया और उनके प्रोत्साहन से अंग्रेज़ी में भी पद्य रचना करने लगे। ये उनकी शायरी की क्षमता के प्रारम्भिक ज्वलंत उदाहरण हैं।

भारत सरकार की सेवा में

दर्शनसिंह जी ने सन् १९४१ में बी.ए. ऑनर्स की परीक्षा अच्छे नम्बरों से पास की और भारत सरकार के सप्लाई एंड डिस्पोजल डिपार्टमेंट में क्लर्क के रूप में भर्ती हुए। किंतु जल्दी ही अपनी मेहनत

### प्रस्तावना

और योग्यता की बदौलत १९४३ ई. में अफसर बना दिये गये। तरक्की करते-करते डिप्टी सेक्रेट्री हुए और इस पद से सेवा मुक्त हुए।

दर्शनसिंह जी जब सरकारी नौकरी के सिलसिले में दिल्ली आये, तो उर्दू के मशहूर शायर, शमीम 'किरहानी' की शागिर्दी का उन्हें गौरव प्राप्त हुआ, जिनसे उन्होंने काव्य काल के गुण और दोष को जाना समझा। वे उनकी संस्था हलक़ए अरबाबे ज़ौक़ में भी शामिल हुए और उसके कर्मठ सदस्य बन गये। इस काल में वे मुशायरों, क़सीदों की महफ़िलों और मीलादों में भी हिस्सा लेने लगे और हर जगह सराहे और पसंद किये गये ।

१९४५ ई. के आसपास डिपार्टमेंट की तरफ से उन्हें सप्लाई के ठेकों की एलाट करने की ज़िम्मेदारी निभाने के लिए बम्बई जाना पड़ा। इस पद पर रहकर यदि वे चाहते, तो लाखों में खेलते, लेकिन उन्होंने हराम की कमाई की कल्पना को हराम समझा। यहाँ तक कि बम्बई में रहने के ज़माने में उन्होंने किसी के हाथ से पानी लेना भी गँवारा नहीं किया। उन्होंने वहाँ की पूरी गाथा अपने पिता को लिख भेजी जिसे पढ़कर उनके पिता बहुत खुश हुए। जिस की चर्चा जब तक उन्होंने अपने भाषणों और प्रवचनों में भी की।

शादी और संतानें

१९४३ ई. में दर्शनसिंह जी की शादी सरदार जसवंत सिंह सोबती की बेटी हरभजन कौर से हुई। हरभजन कौर की प्रारम्भिक शिक्षा कराची में हुई। बाद में उन्होंने अंग्रेज़ी, फ्रेंच, जर्मन, स्पेनिश और अन्य भाषाओं को सीखा। संत दर्शनसिंह जी महाराज के मानने वाले दुनिया भर के श्रद्धालु अब उन्हें माता हरभजन कौर के नाम से याद करते हैं। हरभजन कौर जी ने भारतीय शास्त्र संगीत का गहरा अध्ययन किया है और अपनी दिल में उतरने वाली मधुर आवाज़ से दर्शनसिंह जी की

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

वाणी और अच्छे विचारों से हम बड़े से बड़ा असंभव कार्य भी कर सकते हैं। वजह तर्क और बहस में न पड़े। अपने किए हुए सहयोग कभी गिनाए नहीं और न ही चर्चा करें। इस से आप दूसरों की नजरो से गिरते हैं इधर उधर की बातें करना, निन्दा करना, गुप्त बातें वर्णन करना. अपनो की बुराई करना, इस से भी आप की छवि खराब होती है। हमेशा सामने वाले की कमी निकाल कर उसको छोटा और स्वयं को श्रेष्ट साबित करने की कोशिश नहीं करो। ये आदत कलयुग की है। इसी के कारण आज प्रत्येक घर, प्रत्येक देश और प्रत्येक संगठन दुखी है। कोई निंदा करता है तो करें, लेकिन मुझे नहीं करना है। जीवन में अनेक ऐसे लोग मिलते हैं जो हमें लड़ने के लिये उत्तेजित कर देते हैं। ऐसे लोगों से दूर रहें। सभी में अच्छाई देखेंगे तो स्वयं भी अच्छे बनते जाएंगे। आप का समय जो संघर्ष में नष्ट होता है वह बच जाएगा और आप महान कार्य कर सकेंगे। शुक्रिया की भावना अवसाद को दूर करती है। किसी के प्रति पहली प्रतिक्रिया पर सोचें, गलत जवाब ना दें, जो आप को अच्छे लगे वही बोल बोलें। ऐसा क्या बोलू जो हमारी बन जाएं न कि बिगड़ जाएं। यही असली प्रशंसा हैं। ऐसा करने से आप का समय जो आपसी संघर्षो में व्यर्थ जाता है।

### अंतरीक बल

१ वह बच जाएगा। यही उत्तम समय प्रबन्धन है।

दूसरों का परिवर्तन करने से पहले हमें अपना परिवर्तन करना चाहिए। जो स्वयं अस्त व्यस्त है वह दूसरों को क्या व्यवस्थित करेगा। दूसरों को ठीक करने में समय और एनर्जी नष्ट होती हैं, दूसरे लोग फिर भी नहीं बदलते। जो स्वंय सबल होगा वही दूसरों को शक्तिशाली बना सकेगा। जो खुद भिखारी हैं वह दूसरों को क्या दान करेगा। अगर मुखिया का स्वंय पर नियन्त्रण नहीं तो उस संगठन में एकता आ नहीं सकती। उस संगठन में उत्पीड़न होगा। कमजोर व्यक्तियों का शोषण होगा। हम इस बात को स्वीकर नहीं करते कि सामने वाला हम से अच्छा समझदार है। हम झुकते नहीं। हम किसी से सीखना नहीं चाहते। झूठी अकड़ हमें जीने नहीं देती। हमें दूसरों की छोटी छोटी बातें चुभती हैं। ये छोटी छोटी बातें बने बनाए कार्य तहस नहस कर देती हैं। इस से हमारा विकास रुक जाता है। हम अपने चारो तरफ नरक बना लेते हैं। इस से समय बर्बाद होता है। ऐसे ही हमें ईर्ष्या भी परेशान करती है। ईर्ष्या अर्थात दूसरों के पास सुख-सुविधाएं है, हम वह पाना चाहते हैं। जब दूसरों जैसी सुविधाए नहीं मिलती है तो हम उनसे ईर्ष्या करने लगते हैं।

ईर्ष्या अर्थात हम उन जैसा बनना चाहते हैं, उनका स्थान लेना चाहते हैं। ईर्ष्या द्वारा हम दूसरे के सकून में, दूसरे के आंनद में विघ्न डालते हैं या बुरी योजना बनाते रहते है। स्वंय को हीन समझते हैं तभी ईर्ष्या पैदा होती है। मनुष्य मन ही मन दुखी रहने लगता है। मनुष्य को बदलने के दो ही ढंग हैं। एक है हम किसी को भी सिर्फ प्यार से बदल सकते हैं। दूसरा है हम भगवान की शक्ति से बदल सकते हैं। जो योगी होगा उसके दर्शन मात्र से ही लोग बदलते जाते हैं। अगर योगी योग नहीं लगाता तो उस में ईर्ष्या आएगी ही। लड़ाई झगड़े बढ़ेंगे। अगर आप अपने परिवार को, अपनी संस्था को, देश को झगड़ों से बचाना चाहते हैं और चाहते हैं उन सब का समय अच्छे कार्यों में लगे तो कम से कम २ घंटे योग हर रोज किया करें। समय प्रबन्धन और सूक्ष्म विकार

जब हमारे मन में किसी कारण से तनाव होता है तो हम छोटी छोटी बातों पर उतावले हो जाते हैं। उतावलापन अर्थ का अनर्थ कर देता है। उतावलेपन से गलतफहमियां पैदा हो जाती हैं। उतावलेपन से बने बनाए काम बिगड़ जाते हैं।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

त्यांनी एक छोटासा मायक्रोफोन आईच्या योनीमार्गात ठेवून संशोधन केले. त्यांना या संशोधनात असे आढळून आले की, या ध्वनीलहरी नाभीपर्यंत पोहोचतात. आईच्या हृदयाच्या ठोक्यांच्या लयीत बाळ वाढत असते; त्यामुळे आपण गर्भावस्थेत असताना ज्या गोष्टी बाळाला ऐकवतो, त्या त्याला ऐकायला फार आवडतात, प्रसूतीनंतर बाळ इतरांजवळ रडते. परंतु स्वतःच्या आईच्या कुशीत रडत नाही. गर्भावस्थेत ऐकलेली गीते प्रसूतीनंतर ऐकल्यावर बाळ लगेचच रडायचे थांबते.

याचे सर्वांत मोठे उदाहरण म्हणजे मंगेशकर कुटुंबीय. लता, आशा, उषा, मीना, व हृदयनाथ या भावंडांवर आईच्या पोटात असतानाच गाण्याचे संस्कार झाले.

लता मंगेशकरांचे वडील दीनानाथ मंगेशकर हे गायनाचे वर्ग चालवित असत. त्यांच्याकडे सूर्यकांत, चंद्रकांत हे दोन नायक; गाणं शिकण्यासाठी येत असत. एके दिवशी दीनानाथ मंगेशकर हे कामानिमित्त बाहेर गेलेले होते. त्या वेळी चंद्रकांत व सूर्यकांत त्यांच्या घरी येऊन रियाज करू लागले. त्या वेळी लतादीदी अगदी ४-५ वर्षांच्या होत्या.

### मधुर स्वरसंगीताचे महत्त्व

चंद्रकांत व सूर्यकांत हे दोघे सूर लावत असताना तेथे लता दीदी आल्या व त्यांनी त्या दोघांना सांगितले की, ते चुकीचे सूर लावत आहेत. ते दीनानाथांनी लांबून पाहिले व त्यांना खूप आश्चर्य वाटले. त्यांनी लतादीदींचे खूप कौतुक केले. हे असे घडण्याचे कारण असे की, दीनानाथ हे कायम गायनाचा रियाज करत असत. गर्भावस्थेत असताना माई मंगेशकरांच्या कानावर ते गायन सूर सतत पडत असल्याने त्यांची सर्व मुले आशा, लता, उषा, हृदयनाथ यांच्यावर गर्भावस्थेत असतानाच त्यांच्यावर गायनाचे संस्कार झाले व त्यामुळे हे सर्वजण आज महान गायक झाले आहेत आणि आज सर्व जगाला त्यांनी आपल्या श्रवणीय गीतांनी मोहून टाकले आहे.

जगप्रसिध्द पाश्चात्य संगीतकार बिथोवेन लहानपणापासूनच त्याला कधीही न शिकविलेली धून अगदी लिलया वाजवत असे नंतर लक्षात आले की तो गर्भात असताना त्याची आई नेहमी तीच धून वाजवत असे.


हॅमिल्टन फिल-हर्मोनिक मॉर्किस्ट्राचा संचालक बोरिस ब्रोटही सराव करत असताना काही नवीन धुन तो नोटेशन न बघताच लिलया वाजवू लागलेला पाहून सर्वांनांच आश्चर्य वाटले त्याने आईला ही घटना सांगितली तेव्हा आईची ती आवडती धून असून तो गर्भावस्थेत असताना तिने ती वारंवार वाजविली होती असे सांगितले.

अमेरिकेतील मियामी युनिव्हर्सिटीतील शिशरोग तज्ञ हेन्री टुबीने १९६० साली गर्भावर संशोधन करुन गर्भातील मुल सहा महिन्यांचे झाल्यावर सर्व संभाषण ऐकू शकते व बाहेरील संभाषणाला ते प्रतिसादही देऊ शकते हा निष्कर्ष काढला होता. डेव्हिड स्पल्टे या संशोधकाने गर्भवती स्त्रियांना एक कथा दिवसातून पाच पाच वेळा गर्भाला सांगण्याचा प्रयोग केला पुढे जन्मल्यानंतर हिच कथा मुलानां आवडत असलेली दिसून आली. जी गाणे-भजने, स्त्रोत्र गर्भावस्थेत मुलाला ऐकवत असाल तीच पुढे जन्मानंतर ऐकवली तर रडणारे मूल लगेच शांत झालेले जाणवते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# ‘मेहनतीच्या जोरावर’ तो झाला नौदल अधिकारी’
## नगरच्या रोहित भोरेचे एनडीएतील प्रशिक्षण पूर्ण



नगर – ध्येय जर निश्चित असेल तर माणूस आपली स्वप्ने सहज पूर्ण करू शकतो हे नगरमधील रोहित मारुती भोरे याने दाखवून दिले. भारतीय लष्करात अधिकारी होण्याचे स्वप्नं त्याने पूर्ण केले आहे. त्याने राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी अर्थात एनडीएच्या १४७ कोर्समधून ३ वर्षाचे खडतर असे प्रशिक्षण यशस्वी पणे पूर्ण केले. आता तो पुढील प्रशिक्षणासाठी लवकरच राष्ट्रीय नेवल प्रबोधिनी अर्थात INA मध्ये जाणार आहे.

अहिल्यानगरच्या रोहित मारुती भोरे याने आठवीमध्ये असताना देशसेवेसाठी भारतीय नौदलात जाण्याचे ठरवले होते. त्या दृष्टीने त्याने प्रवास सुरू केला. रोहितने पहीली ते दहावी शिक्षण केंद्रीय विद्यालय अहिल्यानगर येथे घेतले. त्यानंतर थेट छत्रपती संभाजीनगर गाठून सर्व्हिसेस प्रीपेटअरी इन्स्टिट्यूट अर्थात SPI मधून बारावीचे शिक्षण घेतले. त्याच सोबत एनडीए प्रवेशासाठी आवश्यक असणाऱ्या प्रवेश प्रक्रियेची तयारी सुरू केली. शिक्षकाचे मिळालेले योग्य मार्गदर्शन, कुटुंबियांचा आधार आणि मेहनतीच्या जोरावर रोहित याने अवघड अशी एनडीए प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करून एनडीएमध्ये प्रवेश मिळवला.

घरातूनच त्याला लष्कराचे बाळकडू वडिलांकडून मिळाले. त्याचे वडील मारुती भोरे हे निवृत्त नौदल अधिकारी आहेत, व ते सध्या पोलीस दलात इन्स्पेक्टर या पदावर नागपूर येथे कार्यरत असून आई गृहिणी आहेत. त्याच्या यशात आईचा मोलाचा वाटा आहे.

रोहितने सिद्ध करून दाखवले की ध्येय निश्चित असेल तर यश मिळतेच आणि त्याने एनडीए मधील खडतर असे प्रशिक्षण पूर्ण केले.

गौरवास्पद सेवेत आल्याचा आनंद देशासाठी प्रत्येक माणूस आपआपल्या पद्धतीने देशसेवा करत असतो. पण मला वडीलाप्रमाणे भारतीय नौदलाच्या माध्यमातून देशसेवा करता येणार आहे. याचा आनंद आणि अभिमान आहे. एनडीएमध्ये येण्यासाठी देशभरातून लाखो विद्यार्थी प्रयत्न करतात मात्र खूप कमी विद्यार्थ्याला यश मिळते. त्यासाठी शाळेत असताना तुम्हाला तयारी सुरू करावी लागेल.

विशेषत: गणित, भौतिकशास्त्र याचा अभ्यास पक्का करा आणि देशसेवेच्या सर्वात गौरवास्पद सेवेत या, असे रोहित याने सागितले.

# पाल्यास असलेले दिव्यांगत्व स्विकारुन त्यांच्या प्रगतीकडे लक्ष द्या : देवीदास कोकाटे

### जागतिक दिव्यांग दिनानिमित्त शहरातून निघाली दिव्यांग रॅली, कर्णबधीर विद्यार्थ्यांनां श्रवणयंत्राचे वाटप



जागतिक दिव्यांग दिनानिमित्त शहरातून दिव्यांग रॅली काढण्यात आली.

नगर – पाल्यास असलेले दिव्यांगत्व स्विकारुन पाल्याच्या प्रगतीकडे लक्ष देऊन त्याची शैक्षणीक प्रगती करावी. जे आहे ते स्विकारुन आव्हानाला सामोरे जा. समाज कल्याण विभाग व दिव्यांग शाळा नेहमीच आपल्या पाठीशी राहणार असल्याचे आश्वासन देवीदास कोकाटे यांनी दिले.

जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र विळदघाट, व जानकीबाई आपटे मूकबधिर विद्यालय अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक दिव्यांग दिनानिमित्त मंगळवारी (दि.३ डिसेंबर) शहरातून दिव्यांग रॅली काढण्यात आली. दिव्यांगदिनानिमित्त विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

टिळक रोड येथील जानकीबाई आपटे मूकबधिर विद्यालयातून दिव्यांग रॅलीस जि.प. जिल्हा समाजकल्याण अधिकारी देवीदास कोकाटे यांनी झेंडा दाखवून रॅलीला सुरुवात करण्यात आली. दिव्यांग विद्यार्थ्यांनी जुने बस स्थानक येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे समन्वयक डॉ. दीपक अनाप, मुख्याध्यापक विजय आरोटे, पी.डी.कुलकर्णी, डॉ. मेरेकर, गिन्यानदेव जाधव, नितीन अवचर, मुख्याध्यापक योगेश आल्हाट, विजय बळीद, जगन्नाथ माने आदी उपस्थित होते.

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या शालेय कर्णबधीर विद्यार्थ्यांच्या क्रीडा, कला व सांस्कृतिक स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले.

जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र विळदघाट यांनी कर्णबधीर विद्यार्थ्यांनां श्रवणयंत्राचे वाटप केले. अहिल्यानगर कर्णबधीर असोसिएशनचे अध्यक्ष आनंद कडुस, प्रहार संघटनेचे शहराध्यक्ष ॲड. लक्ष्मण पोकळे, कवी सिकंदर शेख आदींसह शहरातील विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशेष शिक्षक सुदाम चौधरी यांनी केले. आभार संजय राठोड यांनी मानले.

# आंतरराष्ट्रीय संगीत परिक्षेत ग्रेस म्युझिक ॲकॅडमीचे यश

### ७ डिसेंबर रोजी वार्षिक म्युझिकल उत्सवाचे आयोजन


आंतरराष्ट्रीय संगीत परिक्षेत यश मिळविणारे ग्रेस म्युझिक ॲकॅडमीचे विद्यार्थी.

नगर – लंडन येथील ट्रीनिटी कॉलेजच्या वतीने घेण्यात आलेल्या परिक्षेत नगरमधील ग्रेस म्युझिक ॲकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी यश मिळविले.

अशिता लोखंडे, ईशा बडवे, व रन पंडीत यांनी इलेक्ट्रॉनिक कि–बोर्ड ग्रेड–२, तसेच भार्गवी ढोके, ओजस राऊत ग्रेड इलेक्ट्रॉनिक कि–बोर्ड ग्रेड –१, चैतन्य गंधे, कौस्तुभ पवार, दक्ष कुलकर्णी, नोएल पंडीत, शालमली साके, भूमिका थापा, शलमोन पहिलवान, प्रज्ञेश कुलश्रेष्ठा, अंजली शितोळे, केवीन सोनावने, सई पटारे, शुभंकर पटारे, प्रतिम काकडे, अमोल दळवी, अभिषेक पोळ, जोएल लोखंडे, हर्षदा गायकवाड, ईरा बड़वे.

इलेक्ट्रॉनिक कि–बोर्ड इनिशियल ग्रेड तसेच ओंकार राऊत प्लॅक्ट्रम गिटार ग्रेड–१,व अँजेलो थोरात, जयालक्ष्मी ढबाळे, रन पंडीत प्लॅक्ट्रम गिटार इनिशियल ग्रेड यांनी या परिक्षेत गुणवत्तापूर्वक यश संपादन केले.

ग्रेस फाऊंडेशनच्या ग्रेस म्युझिक ॲकॅडमीच्या वार्षिक म्युझिकल उत्सवाचे ७ डिसेंबर रोजी संध्याकाळी ५.३० वाजता माऊली संकुल झोपडी कँटीन सावेडी, अहिल्यानगर येथे आयोजन करण्यात आले असल्याचे ग्रेस म्युझिक अक्ॅडमीचे डायरेक्टर पिटर पंडीत सर यांनी कळविले आहे.

या म्युझिकल उत्सवाचे प्रमुख पाहुणे म्हणून सॅक्रेड हार्ट कॉन्व्हेंट हायस्कूलच्या मुख्याध्यापिका सिस्टर करुणा शेंडे, ऑक्झिलियम कॉन्व्हेंटच्या मुख्याध्यापिका सिस्टर निलिमा रॉड्रिग्ज, सेंट मायकल स्कूलच्या मुख्याध्यापिका नाँदिता डिसोझा, ज्ञानसंपदा इंग्लिश मिडीयम स्कूलच्या मुख्याध्यापिका शिवांजली अकोलकर, ग्रेस फाउंडेशनचे सेक्रेटरी लिओ पंडीत हे असणार आहे. या कार्यक्रमात ग्रेस म्युझिक अक्ॅडमीचे विद्यार्थी नवीन जुने हिंदी, मराठी, इंग्रजी गीते सादर करतील. सर्वांना प्रवेश विनामूल्य आहे. लकी ड्रॉ द्वारे प्रेक्षकांसाठी भरपूर बक्षीसेही दिली जाणार आहे.

या वार्षिक म्युझिकल उत्सवामध्ये संगीत रसिकांनी व अहिल्यानगरकरांनी उपस्थित राहून याचा आनंद घ्यावा, असे आवाहन सोनाली पिटर पंडीत मॅडम यांनी केले आहे.


सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे ’भक्ती संध्या’ या भक्ती गीतांच्या कार्यक्रमात अनिरुद्ध धर्माधिकारी यांनी भक्ती गीते सादर केली. समवेत तबला (शेखर दरोडे) संवादिनी मकरंद खरवंडीकर आदी. (छाया – हेमंत ढाकेफळकर)

# सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचच्या ‘भक्तीसंध्या’ त रंगले श्रोते

नगर – जय जय राम कृष्ण हरी, आदी रचली पंढरी मग वैकुंठ नगरी, ब्रह्म मूर्ती नेईन मज माहेरा होईल सोहळा आनंदाचा, संतांच्या गावे प्रेमाचा सुकाळ, कानोबा आले कानोबा तुझी घोंगडी चांगली. असे संत नामदेव महाराज व संत तुकाराम महाराज यांचे सुमधुर अभंग शास्त्रीय गायक अनिरुद्ध धर्माधिकारी यांनी सादर केले.

सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे ’भक्ती संध्या’कार्यक्रम सादर करण्यात आला. संत भाग पंढरीत कीर्तनाचा गजर होत, प्रेमेहरी नाचत नाचत व सखा विरळा ज्ञानेश्वर हा नामदेवांचा अभंग व संत गोरा कुंभार नाटकातील सुमधुर अभंग अनिरुद्ध धर्माधिकारी यांनी सादर केले. यांना तबल्याची साथ (शेखर दरोडे) तर संवादिनी (मकरंद खरवंडीकर) यांनी संगीतमय साथ दिली. यावेळी उपस्थित सर्व ज्येष्ठ नागरिक भक्ती रंगात रंगून गेले होते.

यावेळी मंचचे शरद कुलकर्णी, मोरेश्वर मुळे, बलभीम पांडव, बाजीराव जाधव, सर्वोत्तम क्षीरसागर, पुष्पा चितांबर, ज्योती केसकर, माधवी कुलकर्णी, स्नेहल वेलणकर, शोभा ढेपे, कुमुदिनी बोपर्डीकर, शरद देशमुख, पवन नाईक, जे एल कुलकर्णी आधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाजीराव जाधव यांनी केले. पाहुण्यांचे परिचय माधवी कुलकर्णी यांनी करून दिला तर आभार बलभीम पांडव यांनी मानले.

# श्री दत्त जयंती उत्सवानिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम व सामुदायिक विवाह सोहळा

नगर – दातरंगे मळा येथील श्री दत्त कॉलनीत श्री दत्त जयंती उत्सवानिमित्त श्री सुर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठान (ट्रस्ट) भजन संध्या (हरिहरेश्वर भजनी मंडळ) च्या वतीने धार्मिक, सांस्कृतिक, विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रतिष्ठानचे हे २२ वे वर्षे असून दर वर्षी जयंती उत्सव उत्साहात पार पडतो. तसेच विविध कार्यक्रमांनी या उत्सवाची शोभा वाढते. तसेच या श्री दत्त जयंती निमित्त प्रतिष्ठानच्या वतीने सामुदायिक विवाह सोहळा करण्यात येतो. यामध्ये दरवर्षी ३–४ जोडप्यांचा विवाह लावण्यात येतात, तसेच उत्सवानिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात येते. त्यामध्ये १०० युवक दरवर्षी रक्तदान करतात. या जयंती उत्सवास हजारो लोक दर्शनासाठी गर्दी करुन महाप्रसादाचा लाभ घेतात. प्रतिष्ठानच्या सदस्य व कार्यकर्ते यासाठी परिश्रम घेतात.

श्री दत्त जन्मोत्सव १४ डिसेंबर रोजी असून त्यानिमित्ताने ८ डिसेंबर रोजी रक्तदान शिबिर स.१० ते दु.३ पर्यंत, ९ डिसेंबर रोजी हरिहरेश्वर भजन मंडळ यांचा भजन संध्या कार्यक्रम सायं. ७ ते रात्री ९ पर्यंत, १० डिसेंबर रोजी हास्य जत्रा कार्यक्रम सायंकाळी ७ ते रात्री ९ पर्यंत, ११ डिसेंबर रोजी होम मिनिस्टर कार्यक्रम सायंकाळी सात ते रात्री दहा पर्यंत, १२ डिसेंबर रोजी डान्स प्रोग्राम सायंकाळी ७ ते रात्री १०पर्यंत., १३ डिसेंबर रोजी राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते गरजू विद्यार्थ्यांना नवीन सायकल वाटप सायं. ७ ते रात्री ८ पर्यंत, तसेच रात्री ८ ते १० पर्यंत रंगारंग कार्यक्रम., श्री दत्त जयंतीदिनी १४ डिसेंबर रोजी स.७ ते ९ महारुद्राभिषेक, स.९ ते दु. १२ वा श्री दत्त पादुका पालखी सोहळा, स.१० ते स.११.३० वा. होमहवन, दु.१२.५० वा.महाआरती, दु.१ ते दु.२ वा. सत्यनारायण महापुजा, दु.१ वा. सामुदायिक विवाह सोहळा, दु.१ ते दु.५ महाप्रसाद (भंडारा), सायं.७ ते रा.१० वा. श्री दत्त महाराजांना ५६ भोग नवैद्य प्रसाद, महिलांचा कार्यक्रम होतील. भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री सुर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठानच्या सर्व कार्यकर्त्यांनी केले आहे.

# सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये फूड आणि ट्रेड फेअर साजरा


सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या फूड आणि ट्रेड फेअरचे फित कापून उद्घाटन करताना संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी आदी.

नगर – तारकपूर येथील सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल येथे विद्यार्थ्यांनी फूड आणि ट्रेड फेअर आयोजित करून प्रत्यक्षात खरेदी विक्री व्यवसायाचा अनुभव मिळवला. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी गणित विषया अंतर्गत वर्ग शिक्षिका इशरत शेख आणि तसनीम हकीमजीवाला यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात हा उपक्रम राबविला. मुलांना मार्केटिंग, खरेदी–विक्री, भांडवल, नफा तोटा या गोष्टींना जीवनात किती महत्त्व आहे याचे व्यावहारिक ज्ञान या उपक्रमामुळे मिळाले. फूड आणि ट्रेड फेअर मध्ये विविध खाद्यपदार्थ पाणीपुरी, भेळ, चीज् सँडविच, क्लब सँडविच, नूडल्स, मॅगी, केक्स, पेस्ट्रीज, गेम्स, रगडा, चाट, इडली, दोसा, पॉपकॉर्न, आवळा कॅन्डी, पर्सेस, पाऊचेस, हेअर क्लिप्स, हेअर ॲक्सेसरीज, डस्टर अशा अनेक प्रकारचे वस्तू विक्रीस ठेवण्यात आल्या होत्या. २८ गटांमध्ये असे विविध प्रकारचे खाद्यपदार्थ आणि वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. बऱ्याच मुलांना दुपटीने फायदा झाला, बऱ्याच मुलांना थोडा कमी फायदा झाला आणि काही मुलांना नुकसानही सहन लागले. परंतु हे सगळे त्यांच्या अभ्यासक्रमात असून त्यांना या सगळ्या गोष्टी प्रात्यक्षिकासह शिकायला मिळाल्या.

संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, विश्वस्त सुरेश हिरानंदानी आणि महेश मध्यान यांनी या वेळी उपस्थित राहत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्यांनीही विविध प्रकारच्या वस्तू खरेदी करत मुलांना प्रोत्साहन दिले. प्राचार्य गीता तांबे, उपप्राचार्य कांचन पापडेजा यांच्या मार्गदर्शनाखाली फूड आणि ट्रेड फेअर घेण्यात आला आणि मुलांना विविध प्रकारे मार्गदर्शन करण्यात आले.

संस्थेचे उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, खजिनदार दामोदर माखीजा, विश्वस्त राजकुमार गुरुनानी, हरेश मध्यान मुख्याध्यापिका गोदावरी किरतानी यांनी सर्व प्रोग्राम कमिटीचे अभिनंदन केले. माध्यमिक व पूर्व प्राथमिकच्या सर्व शिक्षकांनी यामध्ये सहभाग घेतला. पालकांनीही मोलाचे योगदान दिले.

# भारतीय नौदल दिन



आज भारतीय नौदल दिन. भारतीय नौदलातर्फे दरवर्षी ४ डिसेंबर हा दिवस भारतीय नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. त्याआधीचा पूर्ण सप्ताह हा देशभरात नौदल सप्ताह म्हणून साजरा केला जातो. ४ डिसेंबर याच दिवशी नौदलदिन का साजरा केला जातो हे जाणून घेऊया. १९७१ सालच्या सुरवातीपासूनच भारत आणि पाकिस्तानमध्ये कमालीचा तणाव निर्माण झाला होता. तत्कालीन पूर्व पाकिस्तानमधून पाकिस्तानी हवाईदल सातत्याने भारतीय हद्दीत घुसखोरी करत होते. भारताने अनेकदा इशारे देऊनही पाकिस्तान आपली खोड मोडायला तयार नव्हते. १९७१ च्या एप्रिल महिन्याच्या सुमारासच युद्ध पुकारण्यासदृश परिस्थिती निर्माण झाली होती. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या पार्श्वभूमीवर सैन्य दलांच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलावली या बैठकीला मंत्रिमंडळातील सर्व सदस्य उपस्थित होते. लष्करप्रमुख सॅम माणेकशॉ यांनी या बैठकीत स्पष्ट सांगितले की, सध्याची परिस्थिती आणि ऋतू हे आपल्यासाठी अनुकूल नसल्याने सध्यस्थितीत युद्ध आपल्याला परवडणारे नाही. युद्धासाठी नोव्हेंबरपर्यंत थांबावे लागेल. नोव्हेंबरपर्यंत सैन्याची जुळवाजुळव व्यवस्थित करता येईल याची खात्री देण्यासही ते विसरले नाही. खरंतर एप्रिलमध्येच युद्ध व्हावे या मताच्या इंदिरा गांधी होत्या पण लष्करप्रमुखांनी परिस्थिती विषद केल्यानंतर नोव्हेंबर पर्यंत थांबण्याचा निर्णय पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाने घेतला. त्यामुळे आपण काहीही केले तरी भारत आपल्याला उलट उत्तर देऊ शकणार नाही अशा आविर्भावात पाकिस्तान वावरू लागला. त्यांनी ३ डिसेंबर रोजी भारतीय सीमाभागावर पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानातून जोरदार हल्ले चढवले. त्याचवेळी भारतीय विमानवाहक युद्धनौका आयएनएस विक्रांतला सागरतळात बुडवण्याची योजना पाकिस्तानने आखली. पाकिस्तानची ही योजना भारतीय नौदलाच्या लक्षात आल्याने भारतीय नौदलाने चुकीचा संदेश पाठवून पीएनएस गाझी ची दिशाभूल केली आणि डाव साधला. भारतीय नौदलाने चढवलेल्या हल्ल्यात गाझी या पाकिस्तानच्या पाणबुडीला जलसमाधी मिळाली. भारताच्या आयएनएस विक्रांतला सागर तळाशी पाठवण्याची स्वप्ने पाहणाऱ्या पाकिस्तानी नौदलाची सर्वात शक्तिशाली असलेली गाझी ही पाणबुडीच सागर तळाशी पोहचल्याने पाकिस्तानला मोठा धक्का बसला. गाझी पाणबुडीला जलसमाधी मिळाल्यानंतर बंगालच्या उपसागरात आयएनएस विक्रांतने आपला दरारा पसरवला आणि पाकिस्तानी नौदलाचे कंबरडे मोडून काढले. आयएनएस विक्रांतवरील धावपट्टीचा वापर करत नौदलाच्या लढाऊ विमानांनी हल्ला चढवून पूर्वेकडे पाकिस्तानला डोकेही वर काढू दिले नाही. हे सुरू असतानाच पश्चिमी मुख्यालयाच्या नौदल ताफ्याने धाडसी नियोजन करुन लहान आकाराच्या नौकांच्या मदतीने छुप्या पद्धतीने पाकिस्तानी सागरी हद्दीत प्रवेश करत थेट कराची बंदरावरच हल्ला चढवला. पाकिस्तानी युद्धनौका, पाणबुड्या त्यांच्यावरील या अचानक झालेल्या हल्ल्याने हादरुन गेल्या. कराची बंदरावर थेट हल्ला होऊ शकतो, याची कल्पनाच पाकिस्तानी नौदलाने केली नव्हती. ३ व ४ डिसेंबरच्या मध्यरात्री भारतीय नौदलाने केलेल्या या हल्ल्याने पाकिस्तानचे कंबरडे मोडले आणि युद्धाचे पारडे भारताच्या बाजूने झुकले. त्यानंतर दहा दिवसांतच पाकिस्तानने शरणागती पत्करली. नौदलाच्या या पराक्रमाची आठवण म्हणून ४ डिसेंबर हा दिवस नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानंतर भारतीय नौदलाचा जगभरात दबदबा निर्माण झाला. अरबी समुद्र, बंगालचा उपसागर आणि दक्षिण महासागरात भारतीय नौदलाचे सामर्थ्य निर्माण झाले. आज भारतीय नौदल हे जगातील सर्वाधिक शक्तिशाली नौदल म्हणून ओळखले जाते. आज भारताचे नौदल हे जगातील पाचव्या क्रमांकाचे नौदल आहे. भारतीय नौदलाकडे एकूण ५५ युद्धनौका आणि ५८ हजार ३५० सैनिक आहेत. भारताकडे ९ विध्वंसक, १५ नौका, न्यूक्लिअर हल्ला करणारी एक पाणबुडी, १४ पारंपरिक पाणबुडीसह आधुनिक शस्त्रे आहेत म्हणूनच जगातील सर्वात शक्तिशाली नौदलामध्ये भारतीय नौदलाची गणना होते. भारतीय नौदलाला नौदल दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!



न्यू आर्टस च्या राष्ट्रीय सेवा योजनेचे राळेगण येथे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरात बोलताना अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील.

# राष्ट्र उभारणीत युवकांचा सहभाग आवश्यक

### ॲड. विश्वासराव आठरे पाटील यांचे प्रतिपादन; न्यू आर्टसच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे हिवाळी श्रमसंस्कार शिबीर

नगर – शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या मनावर चांगले संस्कार होण्यासाठी विशेष श्रमसंस्कार शिबीर महत्त्वाचे आहे. यातूनच ग्रामीण भागातील समाज जीवन, त्यांची संस्कृती व त्यांच्या समस्या समजतात. अपेक्षित ध्येय साध्य करण्यासाठी प्रामाणिकपणा व कष्ट महत्वाचे असतात. श्रमदानातून मूल्यांची जोपासना होते, असे प्रतिपादन समारंभाचे अध्यक्ष अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील यांनी केले

न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहमदनगर या कनिष्ठ महाविद्यालयाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर, श्रीराम विद्यालय राळेगण म्हसोबा येथे झाले. या समारोप ॲड. विश्वासराव आठरे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय कळमकर, कला शाखा समन्वयक प्रा.डॉ. किसन अंबाडे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य प्रा.कल्पना दारकुंडे, पर्यवेक्षक प्रा. सुभाष गोरे, मुख्याध्यापिका श्रीमती तारका भापकर मॅडम, सरपंच सुधीर भापकर, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. दत्तात्रय नकुलवाड, प्रा.बाबासाहेब दुधाडे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी शाळेतील विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# कॅलिडोस्कोप

## कीटकाला घाबरून कारमधून उडी!

**अनेकांना किटकांची किंवा प्राण्यांची भीती वाटते. कुणी सापाला घाबरतो तर कुणी कुत्र्याला. सर्वाधिक लोक हे स्पायडर अर्थात कोळ्याला घाबरतात. अमेरिकेतील एक महिला एका कोळ्याला इतकी घाबरली की चालत्या कारमधून उडी मारली आणि तिची कार सरळ जाऊन नदीत कोसळली!**



अमेरिकेच्या जॉर्जिया राज्यातील एक महिला आपली कार नदीकिनारी पार्क करत होती. तिला कारवर ठेवलेली कायाक (छोटी बोट) नदीत उतरवायची होती. ती घरून छोटी होडी घेऊन आली होती, जी तिने कारच्या टपावर ठेवली होती. नदीलगत कार पार्क करत असताना या महिलेच्या अंगावर एक कोळी पडला. त्याला पाहून ही महिला इतकी घाबरली की जोरजोरात ओरडायला लागली. पुढे तर तिने सीटबेल्ट काढून थेट कारच्या बाहेरच उडी घेतली. तिने हे केले त्या वेळी कार रिव्हर्स गिअरमध्ये होती. ही महिला इतकी घाबरली होती की पळत कारपासून दूर गेली आणि मागे वळून कारकडे पाहिले नाही. ना कारला वाचवण्याचा प्रयत्न केला. तिच्या डोळ्यासमोरच कार आणि बोट दोन्ही नदीत वाहून गेले. जॉर्जिया स्टेट पेट्रोल टीमने सांगितले की संबंधित महिलेने त्यांना सविस्तर घटनेची माहिती दिली. यानंतर टीम १६४ मैल दूर असलेल्या नदीजवळ पोहोचली; पण बचाव पथक नदीकडे पोहोचेपर्यंत कार आणि बोट दोन्ही नदीत बुडाले होते. जॉर्जिया पोलिसांच्या प्रवक्त्याने सांगितले की कार काही सेकंदातच नदीच्या तळाशी बुडाली आणि गायब झाली. नदीत असलेल्या एका बोटीच्या सहाय्याने कार शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला; पण यात पोलिसांना यश मिळाले नाही.




## ३२८ ग्रॅम वजनाची नवजात रॉबिन!

ब्रिटनमधील वेल्समध्ये नुकताच एका मुलीचा जन्म झाला असून तिचे वजन केवळ ३२८ ग्रॅम आहे. या मुलीचा जन्म नियोजित वेळेच्या पाच महिने अगोदर झाला. मुलीच्या आईला गरोदरपणात एवढा त्रास झाला की हॉस्पिटलमध्ये जाताच नवजात बाळाला जन्म दिला. हे नवजात बाळ वेल्समध्ये जन्मलेले आतापर्यंतचे सर्वात कमी वजनाचे मूल आहे. या मुलीचे नाव रॉबिन चेंबर्स आहे तर तिच्या आईचे नाव चॅंटेल चेंबर्स आणि वडिलांचे नाव डॅनियल चेंबर्स आहे. रॉबिनच्या आई-वडिलांचे म्हणणे आहे की, तिचा जन्म झाला तेव्हाच ती इतकी लहान असेल, हे माहीत होते पण तिला हॉस्पिटलमध्येच आयुष्य काढावे लागेल, अशी कल्पना केली नव्हती. या बाळाचे वजन ३२८ ग्रॅम आहे. ती इतकी लहान आहे की आईच्या तळहातात मावते. डेली मिररच्या वृत्तानुसार ही या रुग्णालयात जन्मलेली सर्वात कमी वजनाची मुलगी असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. त्यामुळे तिला अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले. आई चॅंटेलने सांगितले की गर्भधारणेच्या २२ आठवड्यांनंतर तिला वेदना होऊ लागल्या. डॉक्टरांनी तिला सांगितले होते की मूल कदाचित जगणार नाही; पण सुदैवाने तसे झाले नाही. जन्म झाल्यावर रॉबिनला ताबडतोब व्हेंटिलेटरवर ठेवावे लागले. तिला सेप्सिसचा त्रास जाणवत आहे. ती इतकी लहान आहे की तिच्या शिरा शोधण्यासाठी डॉक्टरांना खूप वेळ लागतो. सुरुवातीला तिचे वजन वाढवण्यासाठी डॉक्टरांना खूप अडचणींचा सामना करावा लागला; पण हळूहळू तिचे वजन वाढू लागले. आता रॉबिन तीन महिन्यांची आहे आणि तिचे वजन एक किलो आहे; मात्र जुलैमध्ये जन्म झाल्यापासून ती घरी गेली नसून रुग्णालयातच आहे.

## हॉरर चित्रपटासाठी मांजरांची ऑडिशन!

हॉलिवूडमध्ये एकदा असे घडले की एका चित्रपटातील भूमिकेसाठी चक्क काळ्या मांजरांचे ऑडिशन घेण्यात आले होते. सध्या या ऑडिशनचा फोटो इन्स्टाग्रामवर व्हायरल होत आहे. त्याचे झाले असे की १९६२ मध्ये हॉलिवूडमध्ये 'टेल्स ऑफ टेरर' नावाचा हॉररपट प्रदर्शित झाला होता. यासाठी काळ्या मांजराम्चेही ऑडिशन घेण्यात आले. त्या वेळी चित्रपटाच्या निर्मात्यांनी वर्तमानपत्रात जाहिरात दिली होती की, आपल्या मांजराने चित्रपटात भूमिका करावी, असे वाटत असेल तर ते आपल्या मांजरांना ऑडिशनसाठी घेऊन येऊ शकतात. यानंतर लोक आपल्या मांजरांसह हॉलिवूडमधील एन ब्रॉन्सन एव्हेन्यूमध्ये पोहोचले. लोक आपल्या मांजरांना घेऊन येतील, अशी अपेक्षा निर्मात्यांना अजिबात नव्हती; पण त्यांनी स्टुडिओच्या बाहेर पाहिले तेव्हा १५२ मांजरे रांगेत उभी होती. त्यांच्या गळ्यात एक पट्टा होता, ज्याची दोरी मालकांनी धरली होती. हा प्रसंग फोटोग्राफर राल्फ क्रेनने आपल्या कॅमेऱ्यामध्ये कैद केला. सध्या राल्फचा हा फोटो इन्स्टाग्रामवर व्हायरल होत आहे. १९६१ च्या ऑडिशनदरम्यान त्याने हा फोटो क्लिक केला होता. व्हायरल झालेल्या फोटोमध्ये लोक फूटपाथवर उभे



असल्याचे चित्र दिसत आहे. आपल्या मांजराच्या ऑडिशनचा टर्न कधी येतो, याची वाट ते पाहत होते. इन्स्टाग्रामवर व्हायरल झालेल्या या फोटोला सहा लाखांहून अधिक लोकांनी लाईक केले आहे. हा आगळावेगळा फोटो युजर्सच्या पसंतीस पडत आहे.


## दहाच्या आधी बिछान्यात शिरा

लहान मुलांनी लवकर झोपून लवकर उठायला हवं. काही मुलं वेळेत झोपतात तर काही उगाचच जागत बसतात. चीनमधल्या झेजियांग प्रांतात आता जागणाऱ्या मुलांची खैर नाही. इथल्या प्रशासनाने नवा नियम लागू केला आहे. या प्रांतातल्या शाळकरी मुलांना रात्री दहा वाजता झोपणं अनिवार्य करण्यात आलं आहे. गृहपाठ उरला तरी तो न करता मुलांनी झोपायला हवं, असं फर्मान काढण्यात आलं आहे. इथल्या शिक्षण विभागाने ३३ सूत्री अजेंडा जारी केला आहे. इतकंच नाही, तर इतरांशी आपल्या मुलांची तुलना करू नये, अशी सूचना पालकांना करण्यात आली आहे. अर्थात पालकांचा या नियमाला विरोध आहे. पालकांच्या मते हा होमवर्क कर्फ्यु आहे. मुलांनी गृहपाठ केला नाही तर ती स्पर्धेत मागे पडतील अशी भीती पालकांनी व्यक्त केली आहे. यासोबतच सुट्टीच्या दिवशी मुलांकडून जास्तीचा अभ्यास करून घेऊ नये, अशी सूचनाही करण्यात आली आहे. चीनमध्ये गाओकाओ नावाची परीक्षा होते. ही परीक्षा खूप कठीण असते. ती उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठात प्रवेश मिळतो. त्यामुळे पालक मुलांवर अभ्यासासाठी खूप दबाव टाकतात. हा दबाव कमी करण्यासाठी ही नियमावली तयार करण्यात आल्याचं इथल्या शिक्षण विभागाचं म्हणणं आहे.



## भेदभाव पडला महागात!

पेरु या देशातल्या एका रेस्टॉरंटला दंड ठोठावण्यात आला आहे. आता हा दंड का बरं ठोठावण्यात आला असावा? एखादा नियम मोडल्याबद्दल त्यांना दंड ठोठाण्यात आला असावा, असं तुम्हाला वाटत असेल तर ते चूक आहे. कारण महिला आणि पुरुषांमध्ये भेदभाव केल्याप्रकरणी रेस्टॉरंटला दंड ठोठावण्यात आला आहे. पेरुची राजधानी लिमाच्या समुद्रकिनाऱ्यालगत ला रोजा नॉटिका नावाचं रेस्टॉरंट आहे. या रेस्टॉरंटच्या व्यवस्थापनाने महिला आणि पुरुषांसाठी वेगवेगळं मेनूकार्ड तयार केलं. महिलांसाठी तयार केलेल्या मेनूकार्डमध्ये किंमती छापण्यात आल्या नव्हत्या तर पुरुषांना देण्यात येणाऱ्या मेनूकार्डमध्ये पदार्थांच्या नावाशेजारी किंमती छापण्यात आल्या होत्या. मात्र अशा प्रकारे भेदभाव करणं चुकीचं असल्याचं इथल्या लोकांचं म्हणणं आहे. यासाठी रेस्टॉरंटच्या मालकांना ६२ हजार डॉलर म्हणजे जवळपास ४४ लाख रुपयांचा दंड भरावा लागणार आहे. महिलांना दिल्या जाणाऱ्या मेनूकार्डमध्ये किंमत न छापण्याबाबत रेस्टॉरंट प्रशासनाचा अजब तर्क आहे. मेनूकार्ड बघताना महिला पदार्थाऐवजी त्याच्या किंमतीकडे जास्त लक्ष देतात. किंमतीचा विचार मनात असल्यामुळे महिलांना जेवणाचा आनंद घेता येत नाही. त्यामुळे त्यांना किंमत नसलेलं मेनूकार्ड देण्यात येत असल्याचं रेस्टॉरंट व्यवस्थापनाचं म्हणणं आहे. हा तर्क योग्य की अयोग्य हे सांगता येत नसलं तरी अशा प्रकारे भेदभाव करणं चुकीचं असल्याचं सांगत लिमामधल्या प्रशासनाने दंड ठोठावण्याचा निर्णय घेतला आहे. १९८० मध्ये अमेरिकेतल्या लॉस एंजल्समधल्या एका रेस्टॉरंटनेही महिला आणि पुरुषांमध्ये भेदभाव केला होता. याला विरोध झाल्यानंतर रेस्टॉरंट बंद करावं लागलं.





## ...म्हणून ही खिडकी असते वेगळी

आपण रेल्वेने प्रवास करतो. भारतीय रेल्वेचं जाळं संपूर्ण देशभर पसरलं आहे. दूरवरची अनेक राज्यं रेल्वेच्या या जाळ्यामुळे एकमेकांशी जोडली गेली आहेत. रेल्वेशी संबंधित बऱ्याच बाबी आहेत. पण सध्या आपण रेल्वेतल्या खिडक्यांबाबत जाणून घेऊ. ट्रेनमध्ये खिडकीची जागा पकडायला प्रत्येकालाच आवडतं. पण तुम्ही कधी दाराजवळच्या खिडकीत बसला आहात का? ही खिडकी इतर खिडक्यांपेक्षा थोडी वेगळी असते. डब्यातल्या इतर खिडक्यांना तीन सळ्या असतात. मात्र दाराजवळच्या या खिडकीला चार सळ्या बसवलेल्या असतात. याचं कारण काय, असा प्रश्न तुमच्या मनात आला असेल. दरवाज्याजवळच्या खिडकीतून चोरी होण्याचा धोका बराच जास्त असतो. या खिडकीतून आत हात घालून चोरी होऊ शकते. रात्रीच्या वेळी प्रवासी झोपेत असताना या खिडकीतून चोरी होऊ शकते. चार सळ्या लावल्यामुळे हात आत जाऊ शकत नाही आणि चोरी टळू शकते. याच कारणामुळे या खिडकीला एक अतिरिक्त सळी बसवलेली असते.

## वाघिणीला बसवला सोन्याचा दात

'कारा' या वाघिणीची पाच वर्षांपूर्वी इटलीच्या तस्करांच्या तावडीतून सुटका करण्यात आली होती. ऑगस्ट महिन्यात एक खेळणं चावत असताना तिचा दात तुटला होता. यामुळे काराला बऱ्याच वेदना होत होत्या. डेन्मार्कमधल्या तज्ज्ञांनी जर्मनीतल्या मेसवायलर शहरात कारावर शस्त्रक्रिया केली आणि सोन्याचा दात बसवला. शस्त्रक्रियेनंतर साधारण तीन आठवड्यांनी कारा सर्वसामान्य आयुष्य जगू लागली. काराला सोन्याचा दात बसवण्याची प्रक्रिया दोन टप्प्यांमध्ये पार पडली. ऑगस्ट महिन्यात तुटलेल्या दातावर उपचार करण्यात आले. या प्रक्रियेला दोन तास लागले. ऑक्टोबर महिन्याच्या सुरूवातीला काराला सोन्याचा दात बसवण्यात आला. यासाठी डॉक्टरांना चार तास मेहनत करावी लागली. सोन्याचा दात बसवण्यात आल्यानंतर काराची विशेष काळजी घेण्यात आली. तिला हाडं नसलेलं मांस देण्यात आलं. कारा बराच काळ हा दात चाटत बसायची. या धातूच्या दातामुळे तिला खूपच अस्वस्थ वाटायचं. पण नंतर तिला या दातांची सवय झाली.





## चित्रविचित्र वस्तूसंग्रहालयं

भारतात चित्रविचित्र वस्तूसंग्रहालयं आहेत. अहमदाबादमधल्या व्हिचर वस्तूसंग्रहालयात बरीच भांडी बघायला मिळतात. या संग्रहालयात चार हजारपेक्षा अधिक भांडी मांडण्यात आली आहेत. ही सगळी भांडी विविध धातूंपासून बनवण्यात आली आहेत. प्राचीन काळातली भांडी इथे पहायला मिळतात. राजधानी दिल्लीत सुलभ आंतरराष्ट्रीय टॉयलेट म्युझियम आहे. इथे वेगवेगळ्या आकाराची शौचालयं पहायला मिळतात. हे संग्रहालय दिल्लीतलं खास आकर्षण आहे. इथे पुरातन शौचालयंही आहेत. हे संग्रहालय के. शंकर पिल्लई यांच्या संकल्पनेतून साकारलं आहे. दिल्लीतच एक बाहुल्यांचं संग्रहालय आहे. या संग्रहालयात अत्यंत सुंदर आणि आकर्षक बाहुल्या पहायला मिळतात. हे म्युझियमही के. शंकर पिल्लई यांच्या संकल्पनेतून साकारलं आहे. गुवाहाटीतल्या मायोंग गावात खूपच विचित्र संग्रहालय आहे. या संग्रहालयात मानवी कवट्या तसंच जादूटोण्यासाठी लागणाऱ्या वस्तू ठेवण्यात आल्या आहेत. जादूटोना संग्रहालय याच नावाने ते ओळखलं जातं.



## अशी झाली भेट

एखाद्या जत्रेत हरवलेले भाऊ किंवा बहिणी काही वर्षांनंतर योगायोगाने भेटतात, हे आपण अनेक चित्रपटांमध्ये बघितलं आहे. मात्र प्रत्यक्षातही असे काही योगायोग, चमत्कार घडत असतात. दक्षिण आफ्रिकेमधल्या केपटाऊनमध्ये १७ वर्षांपूर्वी एकमेकांपासून वेगळ्या झालेल्या बहिणींची भेट झाली. या भेटीला कारणीभूत ठरला एक सेल्फी. इथल्या एका रुग्णालयात सेलेस्टे यांनी एका मुलीला जन्म दिला. त्यावेळी त्यांची मोठी मुलगी तीन वर्षांची होती. जन्म झाल्यानंतर अवघ्या तीनच दिवसात हे बाळ तिथल्याच एका नर्सने चोरून नेलं. त्यानंतर या बहिणींनी एकमेकांना पाहिलंही नव्हतं. पण योगायोगाने शाळेतच त्यांची भेट झाली. २० वर्षांची मिशे ज्वानस्वाक हायस्कूलमध्ये शेवटच्या वर्षाला होती. त्याच वेळी तिची बहिण म्हणजे कॅसिडीने तिथे प्रवेश घेतला. या दोघी बरेचदा एकमेकांच्या समोर आल्या. दोघींच्या चेहऱ्यातलं साम्य तिथल्या बऱ्याच विद्यार्थ्यांच्या लक्षात आलं. तुमच्यात तीन वर्षांचं अंतर असलं तरी तुम्ही सारख्या दिसता, असं या दोघींना सांगितलं जायचं. एके दिवशी मिशेने कॅसिडीसह सेल्फी काढला. तिने तो पालकांना दाखवला. या दोघींमधल्या चेहऱ्यातलं साम्य बघून ही आपली हरवलेली मुलगी असू शकते, असं त्यांना वाटलं. आपल्या बहिणीला कोणी तरी चोरून नेलं होतं हे मिशेला तेव्हा कळलं. त्यानंतर कॅसिडीला तिची जन्मतारीख विचारण्यात आली. तिने ३० एप्रिल १९९७ ही तारीख सांगताच हीच आपली हरवलेली मुलगी असल्याची मिशेच्या पालकांची खात्री पटली. मग डीएनए चाचणी करून खात्री करण्यात आली आणि पोलिसांना कळवण्यात आलं. त्यानंतर संबंधित नर्सला अटक करून दहा वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली.





## पंधरा वर्षांपूर्वीचं बर्गर आणि फ्राइज!



२००९ मध्ये आलेल्या आर्थिक मंदीनंतर मॅकडॉनल्डने आईसलॅंडची राजधानी रेक्याविकमधली तीन दालनं बंद केली होती. यापैकी एका दालनात जॉर्टर मरासन नामक माणसाने शेवटची ऑर्डर दिली होती. त्याने बर्गर आणि फ्रेंच फ्राईज खरेदी केले होते. हे दालन बंद होणार असल्याचं कळल्यानंतर त्याने हे पदार्थ जपून ठेवण्याचा पर्याय निवडला. या घटनेला आता पंधरा वर्ष पूर्ण होतील! मात्र हे बर्गर आणि फ्राईज अजूनही टिकून आहे. हे पदार्थ पाहण्यासाठी देश-विदेशातून लोक येत असल्याचं म्हटलं जातं. बर्गर आणि फ्रेंच फ्राईज दक्षिण आईसलॅंडमधल्या सेनोत्रा हाउस परिसरातल्या एका होस्टेलमध्ये काचेच्या पेटीत जपून ठेवले आहेत. सुमारे पंधरा वर्षांपूर्वीचं बर्गर आणि फ्रेंच फ्राईज बघण्यासाठी देश-विदेशातले लोक गर्दी करत असल्याचं हॉस्टेल प्रशासनाचं म्हणणं आहे. दररोज जवळपास लाखो लोक वेबसाईटच्या माध्यमातून हे खाद्यपदार्थ बघतात. हे बर्गर आणि फ्रेंच फ्राईज आधी दुकानात मग गॅरेजमध्ये यानंतर म्युझियममध्ये आणि आता हॉस्टेलमध्ये ठेवले आहेत. बर्गर आणि फ्राईज अजूनही चांगल्या अवस्थेत आहेत हे आश्चर्य आहे!



गटनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड जाहीर होताच अहिल्यानगर शहर भाजपाच्यावतीने ढोल ताशांच्या गजर करत जल्लोष करण्यात आला.

# भाजपच्या गटनेतेपदी देवेंद्र फडणवीसांची घोषणा होताच नगर शहर भाजपाचा जल्लोष

नगर – विधानभवन गटनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची एकमताने निवड जाहीर होताच अहिल्यानगर शहर भाजपाच्या वतीने ढोल ताशांच्या गजर करत या घोषणेचे स्वागत करत जल्लोषात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी पक्षाच्या भाजपाचे झेंडे फडकावत पदाधिकाऱ्यांनी नाचून, नागरिकांना लाडू वाटून आनंद व्यक्त केला. यावेळी देवेंद्र फडणवीसांचे फोटो झळकावत जय श्रीराम..., भारतमाता की जय..., एकच भाऊ देवा भाऊ... अशा घोषणा देण्यात आल्या. तसेच लक्ष्मीकारंजा येथील भाजप कार्यालय ते चौपाटी कारंजा येथील स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्यापर्यंत वाजत–गाजत विजयी मिरवणूक काढण्यात आली.

शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आनंदोत्सवात पक्षाचे पदाधिकारी सहभागी झाले होत. सुनील रामदासी व प्रा.भानुदास बेरड यांच्या हस्ते भारतमाता व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी ॲड. अभय आगरकर म्हणाले, भारतीय जनता पार्टीने पूर्ण राज्यात सर्व विरोधकांना नेस्तनाबुत करत ऐतिहासिक विजय संपादन केला आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या सारख्या डायनामिक, सक्षम, प्रगतीशील नेतृत्वाचा आता मुख्यमंत्री होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्यात महायुती आहे तर गती आहे व प्रगती आहे. देवेंद्र फडणवीस हे पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा अंत्योदयाचा विचार प्रत्यक्षात आणतील. त्यामुळे येणारा काळ हा राज्याच्या विकासाचा, सर्व स्तरातील प्रगतीचा, सर्व समाजाला बरोबर घेत संधी देणारा काळ ठरणार आहे. शहर भाजपच्या वतीने देवा भाऊचे अभिनंदन करताना खूप अभिमान वाटत आहे.

यावेळी सरचिटणीस सचिन पारखी, प्रशांत मुथा, महेश नामदे, बाबासाहेब सानप, सुरेंद्र गांधी, दत्ता गाडळकर, मयूर बोचूघोळ, नितीन शेलार, महिला शहराध्यक्ष प्रिया जानवे, रेणुका करंदीकर, ज्योती दांडगे, राखी आहेर, कालिंदी केसकर, सुनंदा गंजी, सविता कोटा, पल्लवी जाधव, राजू मंगलारप, बंटी डापसे, कैलास गर्जे, महावीर कांकरिया, गोपाल वर्मा, सुहास पाथरकर, बाळासाहेब खताडे, सुनील तावरे, राजेंद्र काळे, अमोल निस्ताने, ओंकार लेंडकर, आकाश सोनवणे, स्वप्निल बेंद्रे, बाळासाहेब गायकवाड, विजय गायकवाड, संपत नलावडे, सुजित खरमाळे, गोकुळ काळे, राहुल जामगावकर, रवींद्र बारस्कर, अनिल सबलोक, धिरडे, संतोष गांधी, वैभव लांडगे, सचिन कुसळकर आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

## शैक्षणिक दाव्यासाठी सादर केले कुणबी जातीचे बनावट जात प्रमाणपत्र

नगर – कुणबी जाती दावा शैक्षणिक प्रकरण जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे सादर करताना बनावट जात वैधता प्रमाणपत्र दिल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी अश्विरनी यशवंत दळवी (रा. भाळवणी, ता. पारनेर) हिच्याविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. जिल्हा जात प्रम ाणपत्र पडताळणी समितीच्या दक्षता पथकाचे पोलीस निरीक्षक अजित नथु सावळे (वय ४१) यांनी फिर्याद दिली आहे.

गौरव यशवंत दळवी यांच्या नावाने तयार करण्यात आलेले बनावट जात वैधता प्रमाणपत्र अश्विरनी दळवी यांनी त्यांच्या कुणबी जाती दावा शैक्षणिक प्रकरण दाखल करताना सादर केले. जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने प्रस्तुत प्रकरणाची छाननी केली असता गौरव दळवी यांच्या नावाने सादर केलेले जात वैधता प्रमाणपत्र खोटे असल्याचे उघड झाले. समितीच्या अहवालानुसार, सदर क्रमांकाचे प्रमाणपत्र ज्योती सदाशिव काळे यांना निर्गमित करण्यात आले होते, असे समोर आले. समितीने या प्रकाराला गांभीर्याने घेतले असून, अश्विनी दळवी यांनी शासनाच्या धोरणाचा गैरफायदा घेण्यासाठी खोटे प्रमाणपत्र तयार करून सादर केले असल्याचे समोर आणले आहे. या प्रकारामुळे समितीची दिशाभूल होऊन सरकारी सवलतींचा गैरफायदा होऊ शकला असता.

पोलीस निरीक्षक सावळे यांनी समितीच्या वतीने तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, अश्वीनी यशवंत दळवी हिच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अमोल गायधनी करत आहेत.

## नव्या सरकारच्या शपथविधी सोहळ्याचे पद्मश्री पोपटराव पवार यांना निमंत्रण



नगर – राज्यातील नवीन सरकारच्या शपथविधी सोहळ्यासाठी पद्मश्री पोपटराव पवार कार्याध्यक्ष आदर्श गाव संकल्प व प्रकल्प समिती महाराष्ट्र राज्य यांना विशेष निमंत्रित करण्यात आले आहे.५ डिसेंबरला मुंबई येथील आझाद मैदानावर मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा होत आहे. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना या सोहळ्यासाठी विशेष निमंत्रित करण्यात आले आहे. २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्या येथे श्रीराम मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे विशेष निमंत्राणानुसार उपस्थित होते. श्रीरामांची मूर्ती घडविताना मूर्तीचे काही तुकडे निवडक ३०० भाग्यवंताना पाठविण्यात आले त्याचा एक तुकडा शिलांश हिवरे बाजारला मिळाला आणि त्याचा उत्सव ग्रामस्थांनी शिलाश स्थापनेनिमित्ताने १६ ते २३ एप्रिल २०२४ चा कालावधीत श्रीराम कथा उत्सव धुमधडाक्यात केला. पद्मश्री पोपटराव पवार या सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत.

## जिल्हा पोलिसांची ‘ऑपरेशन मुस्कान-१३’ विशेष शोध मोहीम; हरविलेल्या, अपहरण झालेल्या व बेपत्तांचा घेतला जाणार शोध

नगर – हरविलेल्या व अपहरण केलेल्या बालकांच्या व बेपत्ता पुरूष, महिलांच्या संदर्भात ‘ऑपरेशन मुस्कान– १३’ ही विशेष शोधमोहीम १ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत राबविली जाणार आहे. याचदरम्यान अहिल्यानगर जिल्ह्यातील हरविलेले व पळविलेले बालके तसेच बेपत्ता महिला व पुरूषांचा शोध घेण्यात येणार आहे.

राज्यभरात ‘ऑपरेशन मुस्कान– १३’ ही मोहीम सुरू झाली आहे. नगर जिल्ह्यात देखील पोलीस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षामार्फत ही मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे पथक हे जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांना भेट देऊन सदर मोहिमेबाबत पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना समक्ष भेटून संबंधित मोहिमेबाबत माहिती देणार आहेत.

तसेच पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हे आपल्या पोलीस ठाणे स्तरावर या मोहिमेसाठी एक अधिकारी व तीन पोलीस अंमलदार असे पथक तयार करून त्यांच्याकडून ‘ऑपरेशन मुस्कान– १३’ व्दारे हरविलेले व पळविलेले अल्पवयीन मुले– मुली तसेच रेकॉर्ड व्यतिरिक्त रेल्वे स्थानके, बस स्थानके, रस्त्यावर भीक मागणारी मुले, कचरा गोळा करणारी मुले, धार्मिक स्थळ, रुग्णालय, हॉटेल, दुकाने इत्यादी ठिकाणी काम करणारी मुले, बेपत्ता महिला व पुरूष यांचा प्रभावीपणे शोध घेतला जाणार आहे.

### समन्वयाने राबविणार मोहीम

अशासकीय संस्था, बालगृह, बालकल्याण समिती, जिल्हा बालसुरक्षा कक्ष यांच्या समन्वयाने पोलीस ही मोहीम राबविणार आहेत. अधीक्षक ओला, अप्पर अधीक्षक खैरे, पोलीस उपअधीक्षक गणेश उगले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजेंद्र इंगळे, उपनिरीक्षक बाळासाहेब शिंदे, पोलीस अंमलदार एस. ए. सय्यद, महिला पोलीस अंमलदार ए. आर. काळे, ए. के. पवार, सी. टी. रांधवन, चालक पोलीस अंमलदार एस. एस. काळे यांचे पथक ही मोहीम राबविण्यासाठी काम करत आहेत.

## ‘ग्लोबल व्हिजन ॲकॅडमी’च्या विद्यार्थ्यांनी घेतला कोहिनूर मॉलमध्ये इंग्रजी भाषा संभाषणाचा अनुभव



ग्लोबल व्हिजन अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी कोहिनूर मॉलमध्ये इंग्रजी भाषेत संभाषणाचा अनुभव घेतला.

नगर – ग्लोबल व्हिजन अकॅडमीने मुलांना इंग्रजी संभाषणाचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा आणि त्यांचाआत्मविश्वास वाढावा म्हणून प्रत्यक्षात इंग्रजी भाषेत संवाद ही लाईव्ह ॲक्टिव्हिटी आयोजित केली. या वेळी अकॅडमीच्या १५ विद्यार्थ्यांनी साधला कोहिनूर मॉल मधील क्रोमा विक्रेत्यांशी इंग्रजीमध्ये संवाद साधला. उपस्थित सर्वांना कोहिनूर ग्रुप च्या संचालिका सौ. श्वेता गांधी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि विद्यार्थ्यांशी इंग्रजीमध्ये संवाद ही साधला. विद्यार्थ्यांनी शोरूममध्ये टीव्ही, मोबाईल, लॅपटॉप, वॉशिंग मशीन वा मायक्रोवेव्ह इत्यादी वस्तू खरेदीसाठी तेथील ग्राहक बनून विक्रेत्यांसोबत इंग्रजी भाषेत यशस्वीरित्या संवाद साधला.

या इंग्लिश संभाषणमध्ये अकॅडमीच्या चि. प्रियांशु यादव, भारद्वाज ओहोळ, आदित्य चव्हाण, खाडे श्रीकांत, अंश नांदूरकर, श्री. कुलकर्णी, अरमान शेख, देवराज गांधी, कु.प्रिया माने, वैष्णवी परदेशी, ऐश्वर्या बेरड, समृद्धी दिंडे, धनवी सोनार, अनुजा गवळी, कशब शेख व सौ. सुजाता शेडाळे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यांच्यासोबत शोरूमचे एक्झिक्यूटिव्ह वाजिद शेख, हरीश रघुवंशी आणि आकांक्षा चींदे यांनी इंग्रजीमध्ये संवाद साधला.

सौ. श्वेता गांधी यांनी अकॅडमीचे संस्थापक, डायरेक्टर प्रा. संकेत गांधी आणि सर्व टीमचे कौतुक करताना भविष्यातील सर्व विद्यार्थीभिमुख उपक्रमांसाठी सहकार्य राहील असे आश्वासन दिले. मॉलचे व्यवस्थापक सचिन घोडके, शोरूमचे मॅनेजर शुभम पवार यांचे सहकार्य लाभले.

## कत्तलीसाठी चालवलेल्या पाच गोवंशीय जनावरांची सुटका

### २ लाख ९८ हजारांचा मुद्देमाल जप्त, दोघा जणांवर गुन्हे दाखल

नगर – टेम्पोतून बेकायदेशीरपणे कत्तलीसाठी घेऊन जात असलेल्या पाच गोवंशीय जनावरांची सुटका करण्यात आली आहे. या प्रकरणी दोघांविरोधात महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम आणि भारतीय प्राणी संरक्षण कायद्यांतर्गत नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेतकरी चांगदेव गोरख भालसिंग (वय ३२, रा. वाळकी ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे.

संतोष तुकाराम गाडे (वय ३६, रा. अंमळनेर, ता. पाटोदा, जि. बीड), अंकुश लक्ष्मण गाडे (वय ५२, रा. कोतन, ता. पाटोदा, जि. बीड) अशी गुन्हा दाखल झालेल्या दोघांची नावे आहेत. अहिल्यानगर– कल्याण रस्त्यावर जखणगाव (ता. नगर) शिवारात सोमवारी दुपारी ही कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, टेम्पोसह पाच जनावरांची सुटका करण्यात आली आहे. टेम्पो (क्र.एमएच १४ एलबी २७८७) व जनावरे असा एकुण २ लाख ९८ हजारांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे.

एका टेम्पोतून गोवंशीय जनावरे वाहतुक केली जात असल्याची माहिती भालसिंग यांना मिळाली होती. त्यांनी सदरचा टेम्पो जखणगाव शिवारात पकडून नगर तालुका पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी जावून टेम्पो व जनावरे पंचासमक्ष ताब्यात घेतली. सदरची जनावरे कत्तलीसाठी नेली जात असल्याचा संशयावरून दोघांविरूध्द तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार झावरे करत आहेत.



एम.आर्च. ही पदव्युत्तर पदवी प्राप्त केल्याबद्दल प्राचार्य अरुण गावडे यांचा आय.एस.डी.टी. संस्थेत शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना संस्थेचे संस्थापक विनायक देशमुख आदी.

## स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी ज्ञानवर्धन आवश्यक

### प्रा.अरुण गावडे यांचे प्रतिपादन; एम.आर्च.बद्दल आय.एस.डी.टी.त सत्कार

नगर – ’सध्याच्या प्रचंड स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी ज्ञान संवर्धनावर विशेष लक्ष द्यावे आणि त्या माध्यमातून स्वतःचे कौशल्य विकसित कराव’, असे आवाहन आय. एस.डी.टी.या संस्थेचे प्राचार्य आर्किटेक्ट अरुण गावडे यांनी केले.

एम.आर्च. ही पदव्युत्तर पदवी प्राप्त केल्याबद्दल प्राचार्य अरुण गावडे यांचा काल आय.एस.डी.टी. या संस्थेत संस्थेचे संस्थापक विनायक देशमुख यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यावेळी श्री.गावडे बोलत होते. याप्रसंगी संस्थेच्या संचालिका पूजा देशमुख, फॅशन डिझायनिंग विभागाच्या प्रमुख पुजा पतंगे, स्मिता बडाख, सानिका बार्शिकर, प्रशासकीय अधिकारी रोहन चारगुंडी व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी बोलताना विनायक देशमुख म्हणाले, कोणतेही शिक्षण घेण्यासाठी वयाची मर्यादा कधीच अडचणीची ठरत नाही २००४ साली बी.आर्च. पदवी प्राप्त केल्यानंतर जवळपास वीस वर्षांनी श्री.गावडे यांनी एम.आर्च. या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला आणि तो यशस्वीपणे पूर्ण केला, ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. विद्यार्थ्यांनीही यापासून प्रेरणा घेतली पाहिजे.

श्री.गावडे यांनी एम.आर्च. च्या अभ्यासक्रम ासाठी ट्रॅडिशनल इंडियन आर्किटेक्चरल नॉलेज सिस्टीम (टिक्स) यात विशेष प्राविण्य संपादन केले आहे. त्यांच्या या ज्ञानाचा समाजाला, संस्थेला आणि विद्यार्थ्यांना निश्चितपणे फायदा होईल, असा विश्वास श्री.देशमुख यांनी व्यक्त केला. तसेच श्री. गावडे यांच्या पुढील कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविक संचालिका पूजा देशमुख यांनी केले. आभार प्रदर्शन रोहन चारगुंडी यांनी केले.

## काव्य संमेलनाच्या माध्यमातून कवींना प्रोत्साहन देणारे नाना डोंगरे यांचा सन्मान



काव्य संमेलनाच्या माध्यमातून कवींना प्रोत्साहन देणारे नाना डोंगरे यांचा साहित्यिकांच्यावतीने सन्मान करण्यात आला.

नगर – नवोदित कवींना प्रोत्साहन देण्यासाठी सहा राज्यस्तरीय काव्य संमेलन यशस्वी करुन निम गाव वाघा (ता. नगर) येथे सातव्या काव्य संमेलनाचे आयोजन केल्याबद्दल काव्य संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे यांचा कवी व साहित्यिकांच्या वतीने सन्मान करण्यात आला.

लेखक तथा कवी बाळासाहेब देशमुख यांनी द माउंटन मॅन हे पुस्तक व कवियत्री सरोज आल्हाट यांनी इंप्रिंट्स ऑफ नेचर ॲण्ड माय सोल या इंग्रजी काव्यसंग्रहाची भेट देऊन डोंगरे यांचा सत्कार करण्यात आला.

स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या माध्यमातून पै. नाना डोंगरे काव्य संमेलनाच्या माध्यमातून कवींना प्रोत्साहन देण्याबरोबर सामाजिक विषयांवर देखील जागृती करत आहे. नवोदित व ज्येष्ठ कवींना व्यासपिठ निर्माण झाला असल्याची भावना लेखक बाळासाहेब देशमुख यांनी व्यक्त केली.

सरोज आल्हाट म्हणाल्या की, ग्रामीण भागातील साहित्यिक कवींना काव्य संमेलनातून प्रोत्साहन देण्याचे कार्य करण्यात आले आहे. नाना डोंगरे निस्वार्थ भावनेने सामाजिक, साहित्य, कला व क्रीडा क्षेत्रात योगदान देत आहे. सातत्याने धडपड करणारे व विविध उपक्रमातून समाजाला दिशा देण्याचा त्यांचा प्रयत्न सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.



माजी उपमहापौर अनिल बोरुडे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शहरप्रमुख संभाजी कदम, माजी महापौर भगवान फुलसोंदर, माजी स्थायी समिती सभापती गणेश कवडे, संजय शेंडगे, शाम नळकांडे, सचिन शिंदे, अमोल येवले, संग्राम कोतकर, दत्ता कावरे, सुरेश तिवारी, गौरव ढोणे, रियाज शेख, अमोल सुरसे, ओंकार कवडे, राजू म्हस्के, राहुल कवडे, शिवा अनभुले, ईश्वर शेळके, रोहित गुंजाळ, दीपक चत्तर गाजू वाघमारे, हरी काळे आदी.

